
कोंडी
उमा कोल्हे

# कोंडी

उमा बाबुराव कोल्हे

ई साहित्य प्रतिष्ठान

# कोंडी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

कोंडी  (कथासंग्रह)

उमा बाबुराव कोल्हे

श्रीबाग नं. २, अलिबाग
रायगड, ४०२२०१

संपर्क क्रमांक 9423837645

umakolhe902@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २५ मार्च २०२० गुढीपाडवा

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# “कोंडी”कोंडलेल्या मनाची घुसमट/ कोंडीतून काढलेली वाट

नाविन्याची ओढ आगळी

कला ही तंत्रज्ञानाने साधली

पानांशिवाय लिहिणे कला वेगळी

कुठेही वाचण्यात मजा मिळाली

ई तंत्रज्ञानाने पुस्तकांच्या अफाट जगात एक वेगळीच लाट उत्साह निर्माण केला आहे. पुस्तकं सतत जवळ बाळगणं कधी कधी शक्य होत नाही. अशा वेळी आपल्या मोबाइलवर जर पण कथा, कविता, कादंबरी वाचणे शक्य झाले तर.... याच संकल्पनेतून उदयास आले ते ई बुक. याच पार्श्वभूमीवर उमा बाबुराव कोल्हे यांनी आपला पहिला “कोंडी”हा ई बुक कथा संग्रह काढला.

या संग्रहात एकूण नऊ कथा आहेत. त्यांच्या कथा वाचत असताना आपण त्या जगत आहो, जगलो आहोत हे वाटणेच कथांना अधिक प्रभावी आणि वाचकप्रिय बनवते.

“मनस्वी”कथेतील आदिती तिच्या जीवनात तिने ठरवलेले उच्च ध्येय जे समाज मान्यतेप्रमाणे कदाचित उच्च नसेल पण तिला शिक्षकी पेशातून खूप आनंद मिळतो. पुढे तिने घेतलेला लग्नाचा निर्णय दुसऱ्या कुटुंबाला आपलेसे करणे. कथेमध्ये ती वृद्धाश्रमात जाते. अन् त्या लोकांना मदतही करते. अशी अदिती आपल्या मनात घर करून जाते.

“मार्ग”या कथेतील केतकी तिच्या जीवनात घडणाऱ्या घडामोडी. जीवनात अनेक लहान मोठ्या संकटांशी झगडत असतानाच, तिने बाळासाठी घेतलेला महत्त्वपूर्ण निर्णय. तिच्या जीवनातील वेगळा मार्ग तिला खूप आधाराचा ठरतो. तिच्यासह तिच्याशी संलग्न अनेक व्यक्तींना त्यामुळे समाधानही मिळते.

“कोंडी”कथेतील विनिता तिच्या जीवनातील निर्माण झालेली कोंडी, तिने प्रयत्नपूर्वक योग्य विचारांसह कृती करून सोडवली. त्यामुळे माहेर सह सासरही आपोआपच जपले गेले. नात्यातील कोंडी योग्य वेळी सोडवल्यामुळे लहानपणी न मिळालेले आईचे प्रेम तिला आपोआपचमिळाले.

कथांबरोबर या ई बुक संग्रहात अनमोल, आघात, वेग, वेगळी वाट, मांत्रिक. नशीब या कथा ही आपल्याला सत्त्यतेतील वास्तव समोर मांडतात. या संग्रहात असणारी स्त्री रूपे प्रेरक आहेत. अनुभव सांगत सांगत अनुभव देऊन जाणाऱ्या कथा, जीवनपथावर यशस्वी मार्ग सुचवणाऱ्या आहेत. यातील स्त्री व्यक्तिरेखा समाजात आपल्या आसपास वावरत असल्याचे जाणवते. रंजक कथातून प्रेरणा देणाऱ्या या कथांचे रसिक वाचक नक्कीच स्वागत करतील.

सौ आशा अरुण पाटील

सोलापूर

**उमा बाबुराव कोल्हे** या एक सिद्धहस्त लेखिका आहेत. अनेक दिवाळी अंकांत व दैनिकांमध्ये त्यांच्या कथा व कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. पदव्युत्तर शिक्षणानंतर त्यांनी अध्यापनाचे कार्य केले आहे. त्याचबरोबर त्यांची बिल्वदल (काव्य) आणि अंतरंग(कथा) ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या बिल्वदल या पुस्तकाला अंकुर साहित्य प्रतिष्ठानचा बहिणाबाई पुरस्कार लाभला असून, अंतरंग या कथा संग्रहाला डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे. त्यांचे साहित्य अनेक सभा संमेलनांतून प्रदर्शित होत असते.

कोंडी हा कथासंग्रह ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना विनामूल्य दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान उमा कोल्हे यांचे आभारी आहे.

अर्पणपत्रिका –

जीवनाच्या महत्त्वाच्या वळणावर
विश्वासाने सोबत देऊन
पाठीशी उभे असणाऱ्या
माझ्या स्वप्नांना सत्यात उतरवणारे
माझे पती
श्री बाबुराव कोल्हे यांना
प्रेमपुर्वक अर्पण

---उमा कोल्हे

# कथानुक्रम

मार्ग

नशीब

वेगळी वाट

कोंडी

मनस्वी

मांत्रिक

आघात

वेग

अनमोल

# कोंडी

# मार्ग

काकीऽऽ काकीऽऽ असा हाक मारणारा मोठा आवाज ऐकून तिकडे न पाहताही मी ओळखले की ही केतकीच असणार. मागे वळून पाहिले तर केतकीची घामाघूम झालेली मूर्ती अर्धवट चालत, अर्धवट धावत येत होती.

"अगं अशी वाघ पाठी लागल्यासारखी का धावतेस? कोणाला हाक मारतेस?”

विरुद्ध दिशेला हात दाखवत धापा टाकत बडबड सुरु झाली. ती बघ बहिरी, एवढ्या जोरजोरात हाका मारतेय तू ऐकल्यास पण तिला ऐकू गेल्यात का?

"अगं, पण येतेस कुठून आणि काय अवतार करून घेतलास?"

"ते मरु दे. ”

“आणि आज काय झालंय, स्वारी खुशीत दिसतेय. "

"बरोबर ओळखलंस ?

"काय विशेष? सुट्टी मिळाली वाटतं ?"

“हो, सुट्टी कसली? पण... '

आणि तिने शरीराला हलकासा झटका दिला चेहरा घामेजला होता. तिला थकवा आला होता. पण चेहऱ्यावरचा आनंद काही लपत नव्हता. आता सांगू कि नंतर सांगू या द्विधा अवस्थेत असतानाच तिला आईची हाक ऐकू आली.

‘ये मी नंतर तुला काहीतरी सांगते हं. आलेच थोड्या वेळात. ’

ती जशी धावत आली तशीच धावत नाहीशी झाली.

"काय विशेष सांगणार आहे?"

मला एक प्रश्नचिन्ह देऊन गेली. मी १४/१५ वर्षांपासून तिला ओळखतेय पण एवढी खुश कधीच दिसली नव्हती. "तिच्यासमोर अनेक समस्या नि प्रश्न होते. अगदी संकटाच्या महाराक्षसा समोरही ती कधी रडली नाही की, स्वतःचं दुःख कुरवाळत बसली नाही. तिची अखंड बडबड सुरुच असायची. तिला भेटणारा माणूस तिला न बोलता पुढे जाऊच शकत नसे. छोटा, मोठा, जवळचा, लांबचा, रागीट, प्रेमळ कसाही असला तरीही त्याच्याशी बोलणारच. जणू स्वतःच्या सगळया समस्यांवरचा उपाय म्हणजे तिची बडबड असावी. पण कधीही हताश, निराश किंवा वैतागलेली दिसली नाही. "

प्रश्न आणि संकटाची ती आवडती मैत्रीण असावी. त्यामुळे त्याची तिला सवयच झाली होती. त्यानंतर जेव्हा जेव्हा ती भेटली तेव्हा घाईतच नि प्रत्येक वेळेस तेच आश्वासन "तुला काहीतरी सांगायचं आहे. "

माझी उत्सुकता ताणल्या जात होती. पण दोघींना संधी काही मिळत नव्हती. एके दिवशी अंगणातल्या आवळयाच्या झाडावरचे आवळे काढले. झाड एवढे भरले होते की, ओझ्याने वाकले होते. ते असेच वाया जाण्यापेक्षा काढून मी शेजारी पाजारी, नातेवाईक सर्वांना देत होते. तिलाही ओंजळभर आवळे दिले तर एकदम खूश झाली. "तुला कोणी सांगितलं?"

"काय"आवळयाकडे पहात म्हणाली.

"तुझे आवळे वेळेवर आलेत गं.

"खरंच"

“होय, तुला हेच सांगायचे होतं. "

आणि मग नेहमीप्रमाणेच तिची न थांबणारी बडबड चालू होती. बातमी ऐकून मी ही खूश झाले होते. एक मोठे प्रश्नचिन्ह केतकीच्या आयुष्यातून कमी होणार होते. केतकी तिघी बहिणीमधील मधली, एक मोठी नि एक धाकटी बहीण, आई व वडील असे कुटुंब. शिलाईकाम करणारे वडील तर आई स्वयंपाक करणारी. कशीतरी कुटुंब खर्चाची मिळवणी व्हायची. मोठी बहीण नववीत असतानाच प्रेमात पडली नि लग्न करून गेली. नवरा रिक्षा चालवायचा. तिला एक मुलगा झाला. ती तिच्या घरी सुखी होती. तिच्या मागे या दोघीही शिकल्या नाहीत. आठवी,

नववीतून घरी बसल्या. तोपर्यंत बाबांनाही मशीन कामाचा त्रास सुरू झाला. त्यामुळे मशीन चालवणे बंद झाले व घरी खानावळ सुरु केली. चौघेही त्यातच गुंतले तसे बऱ्यापैकी चालले होते. पण दोघींच्या तब्येती अतिश्रीमंत झाल्याने लग्न जमणे कठीण होऊन बसले. आर्थिक चणचण, धावणारे कोणी नाही. त्यामुळे उशीरच होत गेला.

पण नातेवाईकाने केतकीसाठी एक स्थळ आणले. विशेष काहीही नव्हते. संधी घालवायला नको म्हणून लग्न झाले. वाटले चला, केतकी तिच्या संसारात सुखी राहील. पण थोडे दिवसात भ्रमनिरास झाला. केतकी सैरभर झाली. नव्या नव्हाळीचे काहीच दिवस नीट गेले होते. तिच्या नवऱ्याचे अगोदर एक लग्न झाले होते नि बायकोच त्याला सोडून गेली होती. तिच्या नवऱ्याला एक जुळा भाऊ होता. दोघाचेही लग्न सोबतच झाले होते. त्याला दोन मुले होती नि याची बायको मात्र सात वर्षानंतर सोडून गेली होती. हा कोठेही टिकून काम करत नव्हता. अत्यंत तिरसट नि तापट, शंकेखोर होता. केतकी कोमेजली माहेरी निघून आली. पण बाबांची प्रकृती अत्यवस्थ असल्याने काही सांगू शकली नाही. त्यातच बाबांचे निधन झाले. केतकी स्वतःचे दुःख कोणालाच सांगू शकली नाही. आईचा विचार करून ती पुन्हा सासरी गेली. सासू, नवरा, दीर, जाऊ, नणंद कोणीही तिला समजून घेतले नाही. सर्वांनी त्रासच दिला. जेव्हा सहनच होईना तेव्हा पुन्हा केतकी माहेरी निघून आली. तिच्या येण्याने घर ढवळून निघाले. केतकीचे लग्न करायचे ते कसे होणार हा प्रश्न असताना केतकीचे येणे धक्कादायक होते. आईने सासरच्यांना, केतकीला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण काही उपयोग होईना. केतकीने सांगून टाकले.

“मी त्याच्याबरोबर संसार करेन पण सासरी राहणार नाही. त्यानेच इथे रहावे. "

आणि माहेरच्या गावात केतकीने वेगळा संसार थाटला.

त्यासाठी दोघांनीही काम करायला सुरुवात केली. पण नवऱ्याचा मुडी नि छंदी स्वभाव तिला त्रासदायक होत होता. मध्येच सासरची मंडळी येऊन त्याला भडकवत. केतकी तुटत चालली होती. एका बाजूला आई नि एकीकडे संसार. आईला वाटायचं एखादं मुल झालं की सगळं सुरळीत होईल. पण तिथेही नशीब तिला साथ देईना. बघता बघता पाच वर्षे झाली. आईचे प्रयत्न सुरु झाले होते. बिचारी प्रत्येक देवाकडे साकडे घालत होती. नवस बोलत होती. डॉक्टरांकडे नेत होती पण काहीही उपयोग होत नव्हता. नवरा डॉक्टरांकडे यायला तयार नव्हता.

त्याचवेळी तिला एका स्त्रीरोग तज्ज्ञांकडे स्वयंपाकाचे काम मिळाले. तिला त्यामुळे अनेक उपाय करण्यासाठी मदत झाली. बघता बघता तिच्या लग्नाला आता नऊ दहा वर्षे झाली नि आज केतकीने गोड बातमी दिली होती. नि तिचा भविष्यकाळ चांगला येणार असे वाटत होते. तेव्हाच तिच्या बहिणीचेही लग्न जमले आणि आठ दिवसात झालेही. बहुधा त्या कुटुंबाचे वाईट दिवस संपले होते. तिच्या बहिणीकडेसुद्धा गोड बातमी होती. आता आईला प्रश्न पडला दोन दोन बाळंतपण कशी होणार? यथावकाश केतकीला मुलगी झाली. पण सिझर करावे लागले. बाळाला ऑक्सिजनवर ठेवावे लागले. बाळाच्या अंगावर लाल मोठे चट्टे होते. बाळ एकदम गोरे गोरे होते. तो रंग आईबाबांना कोठे मॅच होत नव्हता पण वाटले औषधोपचारांनी व घेतलेल्या काळजीचा परिणाम असावा. तिच्या बहिणीलाही तिच्यानंतर महिनाभरात मुलगा झाला. तिचेही सिझर झाले. दोघी दोघींच्या सिझरचा व इतर खर्चाने आईला कर्जबाजारी बनवले. तरीही एवढ्या दिवस रेंगाळणारे प्रश्न सुटल्याच्या समाधानात आईने शारीरिक, आर्थिक संकटांना तोंड दिले. मुलगी जसजशी वाढू लागली तसतसे तिचे वेगळेपण जाणवू लागले. गोंडस, गोरीपान नि चटपटीत ‘लावण्या’सर्वांची आवडती बनली होती.

तिला दिलेले नाव अगदी अचूक होते. एकदा लावण्याला बघून माझी मुलगी चेष्टेने गाणं म्हणाली, "आई बी काळी नि बापूस बी काळा ही पोरी कोणाची. ”

तेव्हा केतकीनं मला सांगितलं की, "लावण्या माझी आहे पण बाबाची नाही. ”

"ये कसली कोडी घालतेस? ती बाबाला हात लावू देत नाही, म्हणतेस का?"

"खरंच ती बाबाची नाही"

"मग कोणाची आहे"

"माहीत नाही"

"काय?"

म्हणून मी निःशब्द झाले होते. अनेक विचार डोक्यात डोकावले ? म्हणजे लावण्याचा पिता दुसरा कोणी आहे? कसे शक्य आहे? नक्की काय प्रकार आहे. काही सुचत नव्हते. एक दिवस

रस्त्यावर एकटीच भेटली दुपारची वेळ होती. रस्त्यावर फारशी गर्दी नव्हती. दोघीही चालतच घराकडे निघालो तेव्हा तिला विचारले,

“लावण्याचा बाबा कोण?".

"तू त्या दिवसापासून तोच विचार करते आहेस का?"

"होय, तू सांगत नाहीस तोपर्यंत... "

“खरं सांगू मलाही माहीत नाही. ”

बोलताना केतकी झाडाखाली थांबली.

"तुला माहित नाही मग कोणाला माहीत आहे"

"कोणालाच नाही"

"काय बडबडतेस त्याचा विचार कर"

“खरंच, तुझ्या शप्पथ “

केतकीने शप्पथ घेऊन स्वतःला खरं बनवलं.

पण प्रश्न मात्र अनुत्तरीच ठेवला होता. माझी गोंधळलेली अवस्था तिच्या लक्षात आली असावी. हे बघ माझा प्रॉब्लेम तुला माहीतच आहे. लग्नाला नऊ वर्ष उलटली होती. आईची माझ्यासाठीची धडपड माहीतच आहे. सर्व देवांना तिने साकडी घातली. झेपत नाही तरी दवाखान्याचा खर्च करत होती. सासरचा त्रास तर जगजाहीर आहेच. पण प्रश्न सुटेना. नवऱ्यापासून मूल होऊ शकणार नाही हे स्पष्ट झाले. तेंव्हा डॉक्टरांनी टेस्टट्यूब बेबीचा पर्याय सुचवला नि... . "

"म्हणजे लावण्या टेस्ट ट्यूब बेबी ?"

"होय, त्यासाठी वर्षभर प्रयत्न करावे लागले,"

"एवढा खर्च?"

"ज्यांच्याकडे मी काम करते त्या डॉक्टरांनीच मदत केल्यामुळे शक्य झाले. "

"पण हे लावण्याच्या बाबाला माहीत आहे?"

माझा काळजीयुक्त प्रश्न

“होय, त्याच्या परवानगीनेच झालं सगळं. "

मी सुटकेचा श्वास घेतला. चला दोघांच्या संमतीने झालं म्हणजे काळजी नाही.

"पण तो कसा काय तयार झाला? आणि तुझी सासू... ?"

"तिला माहीत नाही पण नवऱ्यानेही बरीच नाटके केली. ”शेवटी त्याला त्याच्याच भाषेत समजावलं. माझ्यापुढेही दुसरा पर्याय नव्हता. आता निदान आईला समाधान मिळालं. सासरच्यांची तोंड बंद झाली, नि मी आई झाले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दोघांमध्ये वेगळा विषय आला त्यामुळे जीवनात बरंच काही बदललं"

मला केतकीविषयी सहानुभूती, कौतूक पुर्वीपासूनच होतं. पण आता तिच्याविषयी आदर वाटू लागला. शिक्षण जेमतेम. परिस्थिती हलाकिची, संकट भरपूर अशा परिस्थितीतही तिने निवडलेला मार्ग अचूक नि योग्य आहे. परिस्थितीनं आलेलं शहाणपण म्हणायचं की, ईश्वराची कृपा म्हणायची की चमत्कार? असो विज्ञानाचा उपयोग झाल्याने एक संसार वाचला होता नि त्याच्याशी संलग्न अनेक व्यक्तींना समाधान मिळालं होतं. लावण्याच्या भविष्यासाठी अनेक शुभेच्छा नि केतकीसाठी लढण्याचं बळ मिळो हीच प्रार्थना करुन मी समाधानाने घरी परतले. .

# नशीब

"आई येते गं, माझी बस चुकेल, मी निघतेय. "

"अगं शिल्पा, संध्याकाळी जरा लवकर ये. प्रविणकाका पाहुण्यांना घेवून येणार आहेत. "

"बरं बघते. "

म्हणत शिल्पाने आईचा निरोप घेतला. पण मनातून ती नाराजच झाली होती. आज परत पाहुणे येणार, पाहणार. मागच्या तीन चार वेळेस झाले तेच पुन्हा होणार. आणि नकार आला म्हणून आई उदास होणार. डोक्यात चक्र चालूच होते. पण तिचे पाय मात्र दुप्पट वेगाने चालत होते. नेहमीची बस मिळाली नि रोजची भेटणारी माणसं दिसू लागली. थोड्या वेळातच तिच्या लक्षात आले की दररोज दिसणाऱ्या एक मॅडम आज दिसत नाहीत. तिने मागे पुढे निरखून पाहिले पण त्या आल्याच नव्हत्या. काय झालं असेल? आजारी पडल्या की बस चुकली? काहीही असो आपण का एवढा विचार करतोय? शिल्पा थोडीशी सैलावून बसली. आता तासभर निवांत होता. तिला आईची आठवण आली, आपण आज लवकर येण्याचा प्रयत्न करायचा. आपली इच्छा नसली तरी आईसाठी यायलाचं हवं. किती स्वप्न पाहतेय ती आपल्यासाठी, शेवटी आपणच तर तिचा एकमेव आधार आहोत. आपल्यासाठी तर जगतेय ती. शिल्पाला भरून आलं डोळे ओले झाले. बाबा आईला नि मला सोडून गेले तेव्हा तर मी जेमतेम पाचच वर्षाची होते. एक दिवशी कामासाठी बाहेर गेलेले बाबा परत आलेच नाहीत. आला तो भयानक निरोप, तो भयानक निरोप. बाबा या जगातून गेल्याचे सत्य पचवणे दोघींनाही जडच गेले. सीमाबाईना तर सावरणे खूप कठीण गेले. एकमेव शिल्पासाठी त्यांनी जगण्याचा निर्धार केला नि त्या क्षणापासून शिल्पाला आई आणि बाबा दोन्हींचा भक्कम आधार दिला. अनेक कडू गोड प्रसंगाना तोंड दिले. जे आपले जवळचे वाटत होते त्यांनीही वेळ प्रसंगी तोंड फिरवले. जबाबदारीच्या कल्पनेने जवळची नातीही दुरावली. ज्यानी पाठीशी उभं राहायचं त्यांनीही सोयीस्कर त्रयस्थपणे काढता पाय घेतला. तरीही सीमाबाई खंबीर उभ्या राहिल्या.

शंतनुरावांचे त्यांच्या पतीचे स्वप्न, जबाबदारी नि कर्तव्य यांची जाणीव ठेवून त्यानी आलेल्या प्रत्येक प्रसंगाला तोंड दिले.

शिल्पा शिकली. मोठी झाली. स्वतःच्या पायावर उभी राहिली. आता तिच्या लग्नाची काळजी वाटू लागली. सीमाबाई शिल्पाला योग्य नि तिला भक्कम आधार देईल अशा जोडीराचा शोध घेवू लागल्या. तीन चार स्थळे बघून झाली. शिल्पाला मात्र वाटत होते की आणखी दोन वर्षे तरी लग्न करू नये. एवढे दिवस आईने कष्टच केले. आता तर आपण कमवू लागलो आहेत. एवढ्यातच आईला सोडून जाण्यापेक्षा भविष्याचा विचार करुया. आर्थिक परिस्थिती थोडी बरी झाली की मग लग्न करावे. पण सीमाबाई आपल्या मतावर ठाम होत्या. योग्य वयात सर्व काही झालेले बरे, पण शिल्पाला आईची काळजी वाटत होती. ती एकाकी पडेल सासर कसे असेल, आपण आईसाठी आधार बनू शकू का? तिला एकटे पडू द्यायलाच नको. आतापर्यंत तिने खूप सोसलंय आता काही नको?

“शिल्पा, अगं चल, उतरतेस ना? कसल्या विचारात गुंतलीस?" मैत्रीणीच्या बोलण्याने ती भानावर आली. ऑफिसमध्ये पोहोचल्यावर कामात गुंतून गेली. लंच टाईममध्ये गप्पात पुन्हा लग्नाचा विषय निघाला. .

"शिल्पा आज पाहुणे येणार आहेत ना? कुठले आहेत? मुलगा काय करतोय? कसा आहे?"

"अगं मला काही माहीत नाही. "

“असं कसं लग्न तुझंच करायचं ना? "

"अगं आत्ताच लग्न करण्यात मला स्वारस्य नाही"

“बघ शिल्पा, तुझी मनःस्थिती नि मतं आम्हाला माहीत आहेत,पण कधी ना कधी या परिस्थितीला सामोरं जावं लागणारंच आहे ना?"

"पण तुला तर माहीत आहे, आईच्या जबाबदारीचा विषय काढला की नकार येतो आणि मला आईला एकटं पडू द्यायचे नाही. "

"अगं हो, थोडसं शांतपणे घे. मिळेल असा कोणीतरी. "

गप्पांमधून बरेच सल्ले मिळायचे पण काय होणार हा प्रश्न होताच. आज शिल्पा लवकरच घरी पोहचली. आईला बरं वाटले. दोघी मिळून तयारीला लागल्या.

"आई, केव्हा येणार आहेत प्रवीण काका? “

"अगं पाच वाजता येणार म्हटले होते, पण नंतर सात वाजता येतो म्हणून फोन आला. "

"उशीरा का?"

"आणखी एक स्थळ पाहून येणार आहेत. ”

म्हणजे काही खरं नाही. शिल्पाला मनातून बरं वाटलं. त्यांचा नकार आलेलाच बरा. ती थोडी सैलावली. बरे होईल आणखी काही दिवस जातील. संध्याकाळी साडेसात वाजले तरी पाहुण्यांचा काही पत्ता नाही. सीमाबाई अस्वस्थ झाल्या. येणार की नाही? काय करावे त्यांचा चेहरा चिंताग्रस्त दिसू लागला. शेवटी आठ नंतर पाहुणे आले. यायला उशीर झाल्याबद्दल दिलगीरी व्यक्त केली. प्रविण काकांनी शिल्पाला बाहेर बोलवले. शिल्पा त्या बाईंना पाहून आश्चर्यचकित झाली.

"मॅडम, तुम्ही? इकडे कशा? सकाळी तुम्ही बसमध्ये दिसलाच नाहीत. ”

प्रवीण काकांनाही आश्चर्य वाटले.

“तू ओळखतेस का यांना?”

“हो म्हणजे बसमध्ये रोज भेटतात मला. "

"शिल्पा आज मुली पाहण्याच्या कार्यक्रमासाठी मी रजा घेतलीय. हा माझा मुलगा आर्य."

मग प्रविण काकांनी सर्वांची ओळख करून दिली. आर्य चांगल्या कंपनीत नोकरीला होता. आईवडील नोकरी करीत होते. एक बहीण असून तिचे लग्न झाले होते. त्यांच्या परिस्थितीचा विचार करता होकार येणार नाही, असे शिल्पाला वाटले. चहापाणी गप्पा होऊन मंडळी गेली. निरोप येण्याची वाट पहावी लागणार म्हणून सीमाबाई काळजीत पडल्या. दोन दिवसांनी होकार आला. सीमाबाई खुश झाल्या. मुलगी भरल्या घरात जाईल, चांगल्या माणसांच्या सहवासात राहील. नि सुखासमाधानाने नांदेल. पण शिल्पा अस्वस्थ होती.

"आई मला त्या पूर्ण कुटुंबाला भेटायचं आहे. "

"कशासाठी?”

"...."

“आता तेच प्रश्न उभे करू नकोस. माझी जबाबदारी त्याच्यावर लादू नकोस. नको तो गोंधळ घालू नकोस. ”

"आई असं का म्हणतेस नंतर मतभेद होण्यापेक्षा आत्ताच बोललेले बरे. ”

"शिल्पा, अगं एवढं चांगलं स्थळ नको त्या कारणासाठी घालवू नकोस. "

शिल्पाने जाणले की आई या विषयावर बोलू देणार नाही. आपणच काहीतरी करायला हवं.

“मी मॅडमशीच बोलू कां? तेच बरे होईल. ”

त्याच आठवड्यात योगायोगाने दोघी बसमध्ये शेजारी बसल्या.

"मॅडम, मला तुमच्याशी बोलायचं आहे. "

"बोल गं, तुला आर्य पसंत आहे ना?"

"हो, पण वेगळं बोलायचं आहे. "

"ठिक आहे बोल. "

"इथं नको. "

"मग संध्याकाळी ऑफिस सुटल्यानंतर शितल हॉटेलमध्ये भेटू. ”

"चालेल. '

शिल्पा संध्याकाळ होण्याची वाट पाहू लागली. शब्दांची जुळवाजुळव सुरु झाली. मनात प्रश्नांचे काहूर माजले. मलाच पसंत का केलं. एवढी स्थळं पाहिली. काही प्रॉब्लेम असेल का? आईची जबाबदारी माझ्यावर आहे नि मी आईला अंतर देणार नाही. असे असताना त्याचा होकार टिकेल का? अशा अनेक प्रश्नांनी शिल्पा गोंधळून गेली. नेहमी शांत संयमी दिसणारी शिल्पा आज अस्वस्थ वाटत होती. ऑफिस सुटल्यावर ती साशंक मनाने मॅडमला भेटायला गेली.

"शिल्पा अशी थकल्यासारखी का दिसते, तब्येत बरी आहे ना?"

"ठिक आहे. "

'आपण कॉफी घेऊ या”

दोघी समोरासमोर बसल्या.

"शिल्पा बोल काय झालं. ?"

"मॅडम मला तुमच्याशी बोलायचं आहे, माझ्या आईबद्दल. "

बोल ना, त्यांचा नकार आहे का?

“असं नाही. "

"आईचा होकार आहे पण तुम्हाला माहीत आहेच की. माझे बाबा खूप वर्षांपूर्वी आम्हाला सोडून गेले. मी खूप लहान होते. आईनेच खंबीरपणे मला वाढवले पण?"

"पण काय?"

"म्हणजे मी माझ्या आईचा एकमेव आधार आहे. लग्नानंतरही मी आईची जबाबदारी टाकू शकणार नाही. म्हणजे आईला ते मान्य नाही पण माझे कर्तव्यच आहे. तुम्हाला ते मान्य असेल तर... . "

“अगं शिल्पा, एवढंच ना? मला वाटलं काहीतरी वेगळं आहे. प्रवीण काकांशी या विषयावर बोलणं झालं आमचं. तुझ्या आईचा स्वभाव आणि तुझे संस्कार पाहून तर मी तुला पसंत केलंय. नि आर्यलाही तुमच्या घरचे नियम पद्धती आवडल्या. तुम्ही एकमेकांशी बोला. मगच आपण पुढे जाऊ. ठिक ना. "

शिल्पाला खूप बरं वाटलं. पण आतापर्यंत आलेल्या अनुभवामुळेच मन विश्वास ठेवायला तयार नव्हते. आता तयार होतील नि मग नंतर विरोध केला मग काय? आर्यला एक दोन वेळा भेटल्यावर शिल्पा मनाने आश्वस्थ झाली, नि लग्नाची तयारी सुरु झाली.

एकुलती एक सून म्हणून खूप मौजमजा होत होती. ज्या गोष्टीची अपेक्षा नव्हती त्या सगळ्या गोष्टी होत होत्या. आता लेक सासरी जाणार म्हणून सीमाबाई आनंदातही होत्या नि उदासही होत्या. लेकीचा सहवास कमी मिळणार म्हणून वाईट वाटत होते. बघता बघता शिल्पा सासरी गेली सुद्धा. सगळे कसं झटपट झालं. शिल्पा चार दिवस बाहेर फिरून आली. तिला आईकडे जाण्याची घाई झाली होती. आर्य स्वतःच तिला बाहेर जाऊया म्हणून चक्क आईकडे घेऊन गेला. दोघी मायलेकींना खुप बरे वाटले. दोघेही रजा संपल्यावर कामावर हजर झाले. शिल्पाच्या

मैत्रिणी तिची खूप चेष्टा करायच्या. थोड्याच दिवसात शिल्पाचा वाढदिवस होता. सासरच्यांनी आईच्या मदतीने तिच्या वाढदिवसाची छोटी पार्टी ठेवून तिला सरप्राईज दिले. सुख असे ओसंडून वहात होतं. मध्येच शिल्पा हे सगळं खरं आहे ना? याची खात्री करून घ्यायची. नातेवाईक,फिरणं, मित्र यात दिवस सुखात चालले होते. आता लग्नाला वर्ष झालं होतं. लग्नाचा वाढदिवस साजरा करण्याचे बेत चालले होते. पण शिल्पाची तब्येत बरी नव्हती. दिवसामागून दिवस जात होते. तेवढ्यात लग्नानंतरचा दुसरा वाढदिवस जवळ आला. शिल्पाला तर वाटायचे या घरात आनंदोत्सव साजरा करायला निमित्त पाहिजे. कोणाचा ना कोणाचा वाढदिवस, प्रमोशन, खरेदी चालूच. शिल्पा डॉक्टरांच्याकडे गेली पण आर्य कामानिमित्त बाहेर गावी गेल्यामुळे सासुबाईबरोबर गेली. दुसऱ्या दिवशी पुन्हा रिपोर्ट आणायला गेली. नि तिला वाटलं आर्य बरोबर असायला हवा होता. ती खूप खूश होती नि आजच तिचा वाढदिवस होता. आजच ती आई होणार असल्याची बातमी मिळाली होती. तिने ठरवले ही बातमी अगोदर आर्यलाच सांगायची पण आज वाढदिवस असूनही कोणीच आपल्याला शुभेच्छा दिल्या नाहीत. आई सुद्धा कशी विसरली. मागचा वाढदिवस एवढ्या थाटात नि दुसरा वाढदिवस सगळेच विसरले. मनातून नाराज झालेली शिल्पा उदास मनाने घरी आली. तर काय? घराला कुलूप दाराला चिठ्ठी लावली होती. टेरेसवर ये. शिल्पा वैतागली पाय ओढत टेरेसवर गेली. खूप गर्दी दिसत होती तेवढ्यात आर्य मोठा फुलांचा बुके घेवून आला नि पाठोपाठ आई, सासूबाई, सासरे सगळेजण म्हणजे कोणीच विसरले नव्हते तर... सासूबाई तिला तयार होण्यासाठी घेवून गेल्या. शिल्पाला गोड बातमी कधी आर्यला सांगते असे झालं होतं. पण आताच शक्य नव्हतं. ती पुन्हा टेरेसवर गेली तेव्हा केक कापण्यासाठी आली तर काय अभिनंदनाचं मोठ कार्ड वाट पहात होतं. नि सगळयांच्या चेहऱ्यावर कौतूक आणि आनंद ओसंडून वाहात होता. अरे रिपोर्ट तर मी घेवून आले मग यांना...

"अगं, शिल्पा सकाळीच डॉक्टरांना फोन केला तेव्हाच बातमी समजली. नि आर्यही लवकरच आला म्हणून ही सरप्राईज पार्टी मी नि तुझ्या आईने प्लॅन केली. ”

शिल्पाच्या डोळयात आनंदाश्रू जमा झाले. काही वेळा पूर्वी आलेले मळभ आनंदाश्रूंनी धुवून गेले. तिला आता खूप समाधान नि स्थिर वाटू लागलं. आपले हात आर्यच्या हातात असताना फक्त आनंद नि सुखच लाभणार याची खात्री पटली.

# वेगळी वाट

"कांता, काय म्हणाला गं नितीन. "

"तो काय म्हणणार, आपल्याच मतावर ठाम आहे. "

"अगं,तुझं ऐकेल तो, थोडसं समजूतीने गोडीने घे. "

"आई आहे मी त्याची, मला कळत का नाही. सर्व प्रकारे सांगून बघितलं. पण तो ऐकायला तयार नाही. या अगोदर त्याचं म्हणणं होतं. नोकरी लागल्याशिवाय लग्नबिग्न काही नाही. आता नोकरी लागूनही दोन वर्ष झाली. आता काय?"

"आता त्याला चार चौघांसारखं जगण्यात रस वाटत नाही. "

"म्हणजे"

"नोकरी, लग्न, मुल"

"मग कसं जगायचंय त्याला. ”

कांताबाई त्रासून गेल्या होत्या. एकूलत्या एका मुलाला सुखात समाधानात पहावं. वेळच्यावेळी सर्व काही पार पडावं, एवढीच तर माफक इच्छा होती त्यांची, पण पूर्वीपासूनच नितीनचा दृष्टिकोन इतरांपेक्षा वेगळाच होता. सर्वांसारखं बे एके बे त्याला रुचत नव्हते. प्रत्येक वेळेस आई वडील म्हणून कांताबाई नि शामरावांनी त्याच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला होता. पण जीवनातल्या महत्त्वाच्या टप्प्यावरही याचं वेगळेपण आडवं येत होतं.

"तुझं तू जमवलं असशील तर सांग. "

"आई, तसं काही नाही आणि मला जेव्हा वाटेल तेव्हा मी तुला सांगेन. "

नितीनने विषय संपवून टाकला पण आई वडील मात्र काळजी करत राहिले. कोणत्या ना कोणत्या मार्गाने त्याला लग्नासाठी राजी करण्याचा प्रयत्न करत राहिले. कधी मित्र, कधी मामा, मामी, मावशी समजावण्याचा प्रयत्न करत. बघता बघता आणखी दोन वर्षे गेली. कांताबाई हिरमुसल्या झाल्या. आताशा त्या विषयही काढायला तयार नसत. चार महिन्यात नितीनही घरी

आला नव्हता. शहरात एकटाच राहायचा काम खूप आहे वेळ मिळत नाही. या कारणास्तव त्याचं येणं लांबलं होतं.

"अहो, तुम्ही तरी नितीनला भेटून या, पोराला पहावं, भेटावं, असं वाटत नाही का?"

"अगं मीही बाप आहे त्याचा. वाटत नाही कसे म्हणतेस. "

"मग जाऊन या म्हणजे खुशाली कळेल. "

"दोन दिवसांनी जाईन तू पण येतेस का?".

“चालेल, दोघेही जाऊ. "

मुलाकडे जाण्याच्या विचाराने कांताबाईंना खूप आनंद झाला. त्याला आवडणारे पदार्थ करून नेऊ या. तो खुश होईल. म्हणून त्या तयारीला लागल्या. दोन दिवस जाण्याच्या उत्साहात लगेच संपले. त्याच्यासाठी हे नि ते करण्यात नि भरण्यात कांताबाई दंग होत्या.

"अगं उद्या सकाळी लवकरच निघू या. म्हणजे नितीन ऑफिसला जाण्याआधी पोहचू. सगळं आवरलं ना?"

"होय, सगळे आवरून झालं. आता झोपा” पण कांताबाईंना काही सूचत नव्हतं. रात्र कधी सरेल नि सकाळ कधी होईल असं वाटत होतं.

रात्रीचे अकरा वाजले अजून खूप वेळ आहे. त्या अस्वस्थ झाल्या.

तेवढ्यात बेल वाजली.

"अहो, कोणीतरी आलं वाटतं. "

शामराव यांनी दार उघडलं, अरे नितीन, नितीनला आलेला बघून दोघेही आश्चर्यचकित झाले. पण लगेच शंका वाटू लागली. हा मध्येच कसा आला. सुट्टी नसताना. काय झालं असेल, आजारी तर नाही?"

चेहऱ्यावरून तरी तसं वाटत नाही. तोपर्यंत तो कपडे बदलून फ्रेश होऊन आला.

"नितीन जेवतोस ना?"

“नको आई, जेवण झालंय माझं फक्त दुध घेईन. "

“काय रे एवढ्या अचानक कसा आलास? आम्हीच उद्या तुला भेटायला येणार होतो.

"आई तीन चार महिने येता आलं नाही म्हणून दोन दिवस सुट्टी घेऊन आलोय. “

बोलत बोलत कांताबाईनी दुधाचा कप त्याच्या हातात दिला. बऱ्याच दिवसांनी मुलगा आल्यामुळे दोघेही सुखावले.

इकडच्या तिकडच्या गप्पा चौकशा झाल्या.

"आई, बाबा थोडसं महत्त्वाचं बोलायचं आहे. "

"बोल ना?"

"आई... ”

"अरे एवढं अडखळतोस का? तब्येत बरी नाही का?"

"नाही बाबा,तब्येत ठीक आहे. "

"बघ दमला असशील, आराम कर, सकाळी बोलूया. "

कांताबाई काळजीने म्हणाल्या, बऱ्याच दिवसांनी लेकाला पाहून त्यांना भरून आलं. त्याच्या डोक्यावरुन हात फिरवत त्या म्हणाल्या, "नितीन, तब्येतीकडे लक्ष देत नाहीस. बघ कसा काळवंडलास. ' आपल्या स्मार्ट नि रुबाबदार मुलाकडे बघत कांताबाई म्हणाल्या,

त्यावर शामराव फक्त हसले.

"आई, उद्या परवा थोडी घाई आहे त्यामुळे आपण आताच बोलूया. "

"बरं, काय झालं. ”

"आई, तुला सून हवी आहे ना"

आता कांताबाई खूश झाल्या. चला देव पावला म्हणायचा.

"तुला कोणी पसंत पडली वाटतं?"

"होय,आई पण तुलाही आवडायला हवी ना?"

नितीन लग्नाला तयार झाला याचं त्यांना आश्चर्य वाटले.

"कोणाची मुलगी? कुठे राहते? कशी आहे?"

"अगं थांब थांब त्याला तर बोलू दे, किती प्रश्न विचारतेस"

शामरावांनी कांताबाईना थांबवलं पण तेच प्रश्न त्यांच्याही मनात होते नि चचेहऱ्यावरह उमटले होते.

"आई, बाबा मुलगी कोर्टात नोकरी करते. आपल्या अपेक्षा पूर्ण करणारी आहे. म्हणजे स्वभाव, गुण, दिसायला. "

"अरे, पण तिला तू पसंत आहेस ना? तुम्ही आजकालची मुलं. तुमचे विचार, आवडी निवडी पाहायला हव्यात ना. "

"होय बाबा, आम्ही एकमेकांना पसंत आहोत पण... "

"तिच्या घरचा विरोध आहे का?"

"तसं नाही", बोलता बोलता नितीनने साक्षीचा फोटो दाखवला.

दोघांनाही फोटोतील साक्षी आवडली. "

"अरे, छानच आहे. नाकी डोळी निटच आहे. रंग पण चांगला वाटतो, तेवढ्यात त्याने दुसरा फोटो हातात ठेवला. '

"नितीन हे काय?"

"अरे ती लंगडी?"

"होय आई, ती अपंग आहे. तिला चालण्यासाठी कुबडीचा आधार घ्यावा लागतो. ती सुशिक्षित आहे. सुसंस्कारी आहे. नोकरी करते. स्वतःची कामे स्वतः करते. पण पायाने अपंग आहे."

कांताबाईचा चेहरा उतरला. थोड्या वेळापूर्वी लग्नाला तयार झालेल्या नितीनमुळे त्यांना खूप आनंद झाला होता. एक प्रश्नचिन्ह संपणार म्हणून त्या खूश झाल्या होत्या. पण एकुलत्या एक मुलाने अपंग मुलीशी लग्न का करावं. याचा संसार तरी कसा होणार, लोक काय म्हणतील इ. प्रश्नांनी त्याच्याभोवती गर्दी केली.

"आई,बाबा तुम्ही साक्षीला भेटा तुम्ही हो म्हणालात तरच मी लग्न करेन नाही तर नाही. मला लग्नात इंटरेस्ट नाही. "

थोडक्यात, त्याने आपला निर्णय सांगून टाकला. म्हणजे केले तर साक्षीशीच लग्न करेन नाही तर कोणाशीच नाही. दोघेही गप्प झाले.

पसंत करून केली तर अशी मुलगी. दुसऱ्या दिवशी तिघेही साक्षीला भेटायला गेले. त्याने साक्षीला रुमवरच आणले. गप्पा गोष्टी चौकशी सर्व काही झाले. तिला नाकारावे असे काहीच नव्हते. पण तिचे अपंगत्व कांताबाई खटकत होते. तिघेही रात्री घरी परतले कांताबाई गप्प गप्पच होत्या. नकार ही देता येत नव्हता. आणि होकार देण्यासही मन तयार नव्हते. एकंदर नितीनच्या बोलण्यावरून तो ठाम होता. दोघांनी विचार करून निर्णय घेतलाय. विरोध करून उपयोग नाही. या प्रसंगालाही सामोरे जावू या. पुढच्या सर्व घटना वेगाने घडत होत्या. नितीनला रजिस्टर लग्न करायचे होते. कांताबाईने विधिवत लग्नाचा आग्रह धरला नाही. लग्न झाले. पूजा झाली. नातेवाईकांनी टाकलेले कटाक्ष नि विचारलेल्या प्रश्नांनी दोघेही हैराण झाले. पण मुलाच्या इच्छेपुढे काही चालले नाही.

हळुहळू साक्षी घरात रुळत होती. आपल्या गोड, शांत, मनमिळावू स्वभावाने सर्वांना आपलंस करण्याचा प्रयत्न करीत होती. नितीनच्या भक्कम आधाराने सर्व प्रसंगाना सामोरी जात होती. हळूहळू कांताबाई आणि शामराव थोडेसे निवांत झाले. त्यांना आताआपलेपणा, विश्वास वाटू लागला. साक्षीविषयी प्रेम वाटू लागले. बघता बघता एक दीड वर्ष उलटली. साक्षी घरात चांगलीच रुळली होती. आता कांताबाई ना प्रश्न पडू लागले. इथंवर सर्व ठिक झालं पण आपल्याला नातवंडाचं तोंड कधी नि कसं पाहायला मिळणार.

त्या काही बोलूही शकत नव्हत्या. साक्षीला गरोदरपण कसं झेपेल? बाहेरही कोणी ना कोणी विचारायचं.

"नितीन साक्षी पेढे कधी देणार"

कांताबाईनी ठरवलं. आता नितीनशी स्पष्टपणे बोलूया. एके दिवशी नितीन साक्षी शहरातून आले ते गोड बातमी घेवूनच. कांताबाई खूप खूश झाल्या.

"अरे नितीन, साक्षीला हे सगळं कसं झेपेल?".

“आई, तुम्हाला जसं आजी व्हायचंय. तसं मलाही आई व्हायचं आहे.

तुमच्या डोळ्यातील प्रश्न मला समजत होता. मी एक वर्ष रजेवर राहणार आहे. आई होण्यासाठी मी सर्व काही करेन. “

“आई साक्षी इथेच राहील. तुम्ही सोबत आहात म्हणजे मला काळजी नाही. ”

नितान चार आठ दिवसांनी येत होता. साक्षीच्या सहवासाने दोघेही सुखावले होते. तिच्या गुणांनी ती आणखी जवळची वाटू लागली. साक्षीला सहावा महिना संपून सातवा लागला. तसा नितीनही रजा घेऊन घरी आला. येथून पुढे जास्त काळजी घ्यावी लागणार, साक्षीला पायामुळे जड जाणार, आई बाबांना ते पेलणार नाही.

पुढचे तीन महिने तिघांनीही साक्षीची व्यवस्थित काळजी घेतली.

पहिलं बाळतपण म्हणून साक्षीला न्यायला तिचे आईवडील आले. पण तिला पाठवण्यास नितीनने नकार दिला.

"अरे नितीन, आईवडीलांना न्यावं वाटणारच ना आणि साक्षीला जायला आवडेल. "

कांताबाईंनी नितीनला समजावण्याचा प्रयत्न केला.

"नाही आई, पध्दती महत्वाच्या नाहीत, साक्षीला प्रवास झेपणार नाही नि... "

शामरावांनी दोघांनाही थांबवले नि ते कांताबाईंना हसून म्हणाले.

"आपलं सगळं चारचौघां पेक्षा वेगळं असतं. ”

यथावकाश साक्षीला मुलगी झाली. सर्व काही व्यवस्थित पार पडलं. कांताबाई नि शामराव दोघेही समाधानात नि सूखात होते. छोट्या परीच्या येण्याने घराचे नंदनवन झाले.

"अगं, कांता माझी खात्री पटलीय, माणसानं शरीराने अपंग असलं तरी चालेल पण मनाने अपंग असू नये. आपली साक्षी मनाने खूप श्रीमंत आणि सक्षम आहे. मला तिचा अभिमान आहे. "

"होय हो, आपण कितीही शोधली असती तरी अशी गुणी मुलगी मिळाली नसती. मला तर दोघांचाही अभिमान वाटतो. "

आणि छोट्या परीला उचलत म्हणाल्या.

"आणि आमची परी राणी खूप खूप मोठी होणार. "

"अग आता आपल्या आयुष्यात सुख समाधान बरसत राहणार, हो ना परी राणी?"

# कोंडी

“विनिताऽ... ये विनिताऽऽ"

मी हाक मारत होते. पण कदाचित माझी हाक पोहोचत नसावी. तसा मी माझ्या चालण्याचा वेग वाढवला. पण तेवढ्या गर्दीत ती दिसेनाशी झाली. मी ही घाईतच होते. शोधत बसायला वेळही नव्हता. खूप दिवसांनी दिसल्यामुळे भेटण्याची उत्सुकता होती. अगदी शालेय जीवनात आम्ही एकत्र होतो. त्यानंतर मध्ये जवळ जवळ वीस वर्षे गेली होती. भेटीचा योग नव्हता. मीही माझ्या कामासाठी निघून गेले.

पुन्हा दुसऱ्या दिवशी मला त्याच ठिकाणी दिसली नि पुन्हा तोच अनुभव. त्या दिवशीही भेट झाली नाही. ही नक्की कुठे जातेय. काय करतेय नि इथे कशी? आता माझी उत्सुकता वाढली होती. काय करू ती मला कशी भेटेल? याच ठिकाणी दोन वेळा दिसली म्हणजे रोज येत असेल का? पण या अगोदर कधीच नाही दिसली. असो उद्या पुन्हा इथेच भेटण्याचा प्रयत्न तरी करू म्हणून दुसऱ्या दिवशी थोडीशी लवकर निघाले. पण नाही, आजही भेट नाही. काय झझाले आज का आली नसावी? कि अजून आपण वाट पहावी? मन थोडे नाराजच झाले.

असेच आठ दिवस गेले. रविवार असल्याने भाजी, सामान इतर खरेदी करता करता दोन तास उलटले. घाईघाईने घरी निघाले. मनात कामांची लांबच लांब यादी फडफडत होती. विचारांच्या तंद्रीत गाडी काढत होते तर पाठीमागून कोणीतरी खांद्यावर हात ठेवला.

"काय हो मॅडम, ओळख आहे ना?"

"अरे. विनिता तू? तू इथे कशी?"

“अगं हो. अगोदर गाडी ठेव नि इकडं ये. आपण इथं बसून बोलू या. “

“अगं आठ दिवसापूर्वी तू मला दिसलीस. मी तुला हाक मारली पण तू गर्दीत नाहीशी झालीस नि त्यानंतर दोन दिवस असेच घडत राहिले. आपला लपंडाव मला अस्वस्थ करत होता. तू इथे कशी?"

"अगं, मी इथेच राहतेय पाच वर्षांपासून, तू कोठे असतेस?"

"अगं मी ही इथेच आलेय सहा महिने झालेत, पण एवढ्या दिवसात आपण भेटलोच नाही?"

“असो योग नव्हता. ”

दोघीही घाईत होतो. म्हणून एकमेकींना पत्ते व फोन नंबर देऊन निघालो. पण शालेय जीवनातली मैत्रिण भेटल्याचा खूप आनंद झाला. बालपणीच्या आठवणींनी पुन्हा भोवती फेर धरला. आजची विनिता नि त्यावेळची विनिता किती बदल झाला नाही. नेहमी रडवेली नि गप्प गप्प असणारी विनिता नि तिची सावत्र आई. बापरे ते आठवलं मात्र नि तिला पुन्हा भेटण्याची उत्सुकता वाढली. लवकरच तसा योगही आला. मीच जेव्हा तिला भेटण्यासाठी गेले. तिच्या संसाराची सुरेख चौकट पाहून खुश झाले. दोन मुले,एक मुलगा नि एक मुलगी. सासूबाई,सासरे नवरा, सगळं हसतं खेळतं घर. घरातलं वातावरण अगदी आनंदी. विनिता नि मी बोलत होतो. तेवढ्यात सासुबाई खायला घेऊन आल्या. सासरेही आमच्या गप्पांत सहभागी होत होते. मुलांकडेही लक्ष देत होते.

"विनिता,नशीबवान आहेस?"

"खरंच गं, नशिबानेच अशी माणसं मिळतात. "

"आई, आबी आजी बोलावतेय"

"काय रे कशासाठी?"

"तूच विचार, तू चल”

"ठिकाय येते थांब"

चल गं तू पण ये"

आम्ही तिच्या शेजारच्या ब्लॉकमध्ये गेलो तर तिच्या बाबांचा मोठा फोटो समोरच भिंतीवर लावलेला नि त्या फोटोला हार पाहून मी थबकलेच.

"विनिता, हे काय बाबा?"

"हो, झाली तीन वर्षे”

एवढ्यात एक स्त्री बाहेर आली. ही तर विनिताची सावत्र आई ही इथे काय करतेय? नेहमी वैतागलेली, चिडलेली नि बडबडणारी ही बाई हिचं हे रुपही गोंधळात टाकणारं होतं.

"आई, ओळखलंस हिला?"

"ही माझी शाळेतली मैत्रिण संपदा"

"हो, हो आठवलं, कशी आहेस?"

"मजेत “

आईबरोबर बऱ्याच गप्पा मारून झाल्या. तिचे हे रुप एकदम वेगळं होतं. बाहेर आल्यावर विनिताला आईविषयी विचारलं तर हसली, म्हणाली

"मला वाटलंच तुला आश्चर्य वाटलं असेल ना?"

"बाबा गेल्यापासून मी तिला इथेच ठेवून घेतलंय. "

"अगं, लहानपणी तुला रडवणारी नि बाबांशी भांडणारी ही बाई एवढी कशी बदलली? आणि तू तुझ्याकडे का घेऊन आलीस?"

संपदा, एकमेकांना समजून घेण्यामुळे अनेक प्रश्न सुटतात बघ. तुला आठवत असेल माझी आई वारली तेंव्हा मी सात वर्षाची नि दादा दहा वर्षाचा होता. आमचा सांभाळ करायला म्हणून आजीने जबरदस्तीने बाबांना लग्न करायला लावले. तेव्हा दुसऱ्या आईच वय फक्त बावीस वर्षाचं होतं. दोघांमध्ये सतरा वर्षाचं अंतर. गरिबीमुळे आईला लग्न करावं लागलं असलं तरी तिची स्वप्नं तिच्या इच्छा याचा विचार कोणीच केला नव्हता. त्यात पुन्हा माझी नि दादाची जबाबदारी. त्यामुळे ती अस्वस्थ झाली. हे असं जगणं तिला नको होतं. पण तिच्यापुढे दुसरा पर्यायही नव्हता. तिची घुसमट होत होती आणि जेव्हा तिला कळलं की ती आई होऊ शकणार नाही तेंव्हा ती... "

"काही दोष होता का?"

“नाही, तिच्यात काही दोष नव्हता. पण बाबांनी ऑपरेशन म्हणजे नसबंदीच केलेली होती."

“हे सगळे तुला?”

"अगं हे समजण्याचं माझं ते वय नव्हतं. पण जेव्हा या सगळयाचा अर्थ समजू लागला. सगळे प्रसंग प्रश्न आपोआप उलगडत गेले नि तिच्या वागण्याचे, स्वभावाचे कंगोरे समोर येत गेले. तिची चिडचिड. तिची बडबड मला कळू लागली. आता मला तिचा राग येत नव्हता. तिची दया यायची. मी तिच्या मनाप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करायची. तिला खूप मदत करायची. हळूहळू तिचा रागही निवळत गेला. प्राप्त परिस्थिती स्विकारण्याची मानसिक तयारी झाली नि बाबा आजारी पडले. दादाही शिकण्यासाठी लांब होता. त्या दोघांमधली अढी कायम राहिली. '

"पण तू इथे घेऊन आलीस ते तुझ्या सासरच्या लोकांना आवडलं कसं?"

“संपदा, तुला सांगितलं ना? एकमेकांना समजून घेण्याने अनेक प्रश्न सुटतात. माझं नशीब खूपच चांगलं आहे. माझ्या घरातली माणसं समजूतदार तर आहेतच पण प्रेमळही आहेत. "

"अनुभव माणसाला शहाणं बनवतो नाही?"

“हो तर तिचा काही दोष नसताना या अशा अनुभवांना सामोरं जावं लागल्यामुळे तिची मनःस्थिती बिघडली. बाबांच्या आजारपणात तिने खूप सेवा केली. तेव्हाच माझं लग्न, दादाचं लग्न झालं. बाबा होते तोपर्यंत ती बाबांजवळच होती. नंतर एकटेपणा खायला उठला. दादा नि तिचं भांडण नसलं तरी जवळीक कधीच नव्हती. त्याने कधीच तिचा आई म्हणून स्वीकार केला नाही. मग अशा परिस्थितीत एकटीला कसं ठेवायचं हा प्रश्न होता. "

"तुला अडचण नाही वाटली का?"

“नातं लादलेलं असेल तर अडचण वाटू शकते. म्हणून तिच्यासाठी शेजारचा ब्लॉक विकत घेतला म्हणजे बाबांच्या पैशातून नि तिला इथ आणलं. म्हटलं तर स्वतंत्र नि म्हटलं तर एकत्र असा मार्ग काढला. ”

“काय पण मार्ग काढलास नाही. "

"सासरच्या लोकांनी साथ दिली. आईनेही ॲडजेस्ट केलं म्हणून सगळं जमलं. "

"आणि लहाणपणी अपूरं राहिलेलं आईचे प्रेम आता मिळालं हो ना?"

"नशिबात काय नि कधी मिळणार हे सांगू शकत नाही पण आलेल्या परिस्थितीतून मार्ग तरी काढू शकतो?"

"तू त्या नात्यातली कोंडी फोडलीस. लहान असूनही समजुतदारपणा दाखवलास त्यामुळे हे शक्य झालं. "

"ये आता पुन्हा येशील तेव्हा. सहकुटुंब ये हं"

बाहेर पडताना विनिताने आग्रहाचं निमंत्रण दिलं. मी मात्र तिच्या समजूतदारपणाबद्दल तिला शाबासकी देत खूश होऊन परतले होते. पुन्हा तिला भेटण्याचा निश्चय करूनच.

# मनस्वी

आदिती हातातली कामं भराभर पूर्ण करत होती. आज तिने शाळेतून एक दिवसाची रजा घेतली होती. कशातच लक्ष लागत नव्हतं. गेले आठ दिवस ती विचार अन् विचारच करत होती. घरातले सगळे धास्तावले होते. सासू-सासरे काळजीत पडले होते. "शाळेच्या ट्रीपला गेलेली आदिती आल्यापासून अशी हरवल्यासारखी का आहे? स्वतः आदितीलाही खूपच प्रश्न सतावत होते. पण आज ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळणार होती. तिने निघाल्याचं घरात सांगितलं नि एका वेगळ्या ओढीनं तिची पावलं भराभर पडू लागली.

लहान असल्यापासून तिला शिक्षकच व्हायचं होतं. लहान मुलांच्यात. रमायला तिला खूप आवडायचं. दहावी चांगल्या मार्कांनी पास झाल्यावर नातेवाईकांना वाटलं- आदिती मेडीकल, इंजिनिअरिंग अशी वाट निवडेल पण आदितीला डी. एड. ला जायचं होतं. त्याप्रमाणे तिने ॲडमिशन घेऊनही टाकली. तरीही तिचे काका तिला समजावत राहिले की, "तू एवढी हुशार आहेस तर काहीतरी वेगळं कर."

दोन्ही भावांमध्ये एकच मुलगी नि तीन मुलगे असल्याने आदिती सर्वांचीच लाडकी होती. असो!

तुझ्या मनाप्रमाणे होऊ दे. म्हणून सर्वांनी विषय संपवला. आवडते करिअर असल्याने आदितीने मनापासून कोर्स पूर्ण केला. आता वेळ होती नोकरी करण्याची. इथेही तिने आपलाच हट्ट पूर्ण केला. तिला खेड्यापाड्यातल्या शाळेमध्ये नोकरी करायची होती. बाबा नि काका तिला मोठमोठ्या संस्थांची माहिती द्यायचे. तिचे मन वळवण्याचा प्रयत्न करायचे. पण इथेही आदितीने आपलेच म्हणणे खरे केले. आई आणि काकी दोघीही तिला समजवण्याचा किंवा काही सुचवण्याचा अजिबात प्रयत्न करायच्या नाहीत. त्यांना माहित होतं. तिला जे वाटतं तेच ती करते..."

आदितीच्या इच्छेप्रमाणे ती एका खेड्यातील शाळेवर हजर झाली. तिला असं एकटं ठेवणं आईबाबांना पटत नव्हतं. शाळेतल्या शिक्षकांच्या मदतीने आदितीची राहण्याची सोय एका विद्यार्थ्याच्या घरी करण्यात आली. त्या घरातही भरपूर लोक होते. हळूहळू आदिती त्या घरात एकरूप झाली, इतकी की त्यांचीच मुलगी आहे असे सर्वांना वाटायचे. आई, बाबा पण काळजीमुक्त झाले होते. बघता बघता पाच वर्षे झाली होती. आता आदितीचं लग्न करण्यासाठी बाबा नि काका

मुलगा शोधू लागले होते. तिचं व्यक्तिमत्त्व पाहून चांगली-चांगली स्थळं येत होती. त्या सर्व स्थळांमधून तिने असं स्थळ निवडलं की, तिला पुन्हा खेड्यातच जावं लागणार होतं. सर्वांना प्रश्न पडला, लोक शहराकडे धाव घेतात नि आदिती खेड्याकडे धावतेय. ते एका डॉक्टरांचं स्थळ होतं. पण त्यांनाही खेड्यात राहून तिथल्या लोकांची सेवा करायची होती. विचार जुळले. मतं जुळली. इथेही तिनं आपलंच म्हणणं खरं केले. घरी सासू,सासरे, दीर,नणंदा यांनी घर भरलेलं होतं. लग्नात आई - बाबा, काका-काकू यांच्याबरोबर ती ज्या घरात राहिली ते अण्णा, काकू त्यांची मुलं असा सारा परिवार धावपळ करत होता. आदितीला सासर एक, पण माहेर मात्र दोन मिळाली होती. अण्णा काकू वरचेवर तिला भेटायला येत. तिही त्यांच्याकडे जायची. सर्व कसं मजेत चाललं होतं. आदिती दोन मुलांची आईही झाली. भावांची लग्न झाली. इकडे अण्णांच्या मुलांचीही लग्न झाली. सर्व लग्नात आदितीने करवलीचा हक्क बजावला. "

पाच वर्षांपूर्वी तिच्या डॉक्टर नवऱ्याने नि तिने दुसऱ्या ठिकाणी, स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. जिथे काहीही सोयी सुविधा नव्हत्या त्या लोकांना वैद्यकीय आणि शैक्षणिक सोय उपलब्ध करून देण्याच्या हेतूने दोघांनी प्रयत्न करण्याचे ठरवले. दूर गेल्यामुळे भेटीगाठी मधील अंतर वाढू लागले होते. आठ दिवसापूर्वी आदिती शाळेतील मुलांना एका धरणावर सहलीसाठी घेऊन गेली होती. दिवसभर फिरून, नाचून मुलं खुश होती. येताना एका निसर्गरम्य ठिकाणी असलेल्या 'वृद्धाश्रमाला भेट देण्यासाठी सर्वजण थाबले. वृद्धाश्रमात असलेले आजी-आजोबा त्यांची काळजी घेणारे डॉक्टर नि सेवक त्यांच्यासाठी असणाऱ्या सोयी-सुविधा याविषयी माहिती देत देत आदिती मुलांना घेऊन पुढे पुढे जात होती. एका मुलाने विचारले, 'पण बाई , या आजी आजोबांना इकडे का पाठवतात ? त्यांना घर नाही का?'

'त्यांची घरं आहेत. मुलं आहेत सांभाळायला, यांची काळजी घ्यायला त्यांच्याकडे वेळ नाही. '

"बाई, त्या आजी होत्या ना, त्या मला जवळ घेऊन खूप पापे घेत होत्या, माझी पण नात तुझ्याएवढीच आहे असं म्हणत होत्या."

"होय गं, त्यांनाही त्यांच्या मुलांची नातवंडाची आठवण येतच असते ना?".

"बाई, मग पोलीस त्या आजी आजोबांच्या मुलांना पकडून का नेत नाहीत?"

"अरे जबरदस्तीने कोणी सांभाळण्यात काय अर्थ आहे. प्रेमाने केलेली प्रत्येक कृती स्वर्गीय आनंद देते. "

मुलांचे प्रश्न थांबत नव्हते. तेवढ्यात वृद्धाश्रमातील एक कर्मचारी. त्यांना आश्रम दाखवण्यासाठी आला. राहण्याची सोय, मनोरंजनासाठी वेगवेगळे पर्याय हे दाखवत पुढे जात असताना एका खोलीत शिरले नि. आदिती पाहतच राहिली.

"अण्णा, तुम्ही इथे?"

अण्णा मात्र अस्वस्थपणे फेऱ्या मारत होते. एवढेजण खोलीत आले. किंवा आदिती काही बोलतेय याकडे त्यांचं लक्ष नव्हतं. अस्वस्थपणे फेऱ्या मारता मारता ते बाहेर निघून गेले. आदितीला प्रश्न पडला "एवढ्या भरल्या घरात राहणाऱ्या अण्णांवर ही वेळ का यावी? आपल्याला काहीच कसं माहीत नाही? कोणीच काही का सांगितलं नाही?

"मॅडम जायचे ना?”कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाने आदिती भानावर आली.

"आता बाहेर गेलेले आजोबा भेटतील का?”

"होय, मी त्यांना नंतर घेऊन येईन. "

कर्मचाऱ्याने आश्वासन दिल्याने आदितीला बरं वाटलं. सर्व आश्रम पाहून झाला होता. आदितीला आण्णांना भेटण्याची घाई झाली होती. पण योग नव्हता हेच खरं. तो कर्मचारी सांगत आला.

"मॅडम, ते शहरातल्या हॉस्पिटलमध्ये गेले आहे ? तुम्ही त्यांना पुढच्या शुक्रवारी भेटू शकाल. आणखी आठ दिवस?"

"ठिक आहे. मी ही चिठ्ठी ठेवते. ती त्यांना आल्यावर द्या.” चिठ्ठीत नांव, फोन नंबर ठेवला व फोन करण्यास सांगितले.

काल अण्णांचा फोन आला म्हणून आज आदिती अण्णांना भेटायला निघाली होती. आश्रमात पोहचल्यावर तोच कर्मचारी तिला अण्णांकडे घेऊन गेला. आश्रमातल्या हॉस्पिटलच्या रुममध्ये एका बेडवर अण्णा बसले होते. आदितीला पाहिल्यावर अण्णा उठले. आदितीने त्यांना घट्ट मिठी मारली. तिचे डोळे आपोआप वाहू लागले होते. थोड्या वेळाने अण्णांनी सांगितले की हे आपल्या शेजारी राहणारे नाना काका.

"नाना काका? तुम्ही दोघे इकडे कसे? त्यांना काय झालंय? मला तुम्ही का नाही सांगितलं?"

"अगं, जरा थांब, किती प्रश्न विचारलतेस ?"

अण्णांनी नर्सला नाना काकांची काळजी घ्यायला सांगितली व दोघे बाहेर आले.

"आदिती, नानांना मुलं नाहीत हे तर तुला माहीत आहेच. खूप हौशी नि आनंदी माणूस. पण बायको वारली नि पुरता ढेपाळला. "

"कशाने वारली?"

"ताप आल्याचं निमित्त झालं. "

"कधी झालं हे सगळं?"

"दहा महिने झाले. तेंव्हापासून नाना संपलाच बघ. म्हणून त्याला इथे आणला. म्हटलं समदुःखी माणसांबरोबर राहिला तर थोडा सावरेल, पण इथे आल्यावर दुसऱ्याच दिवशी घसरून पडला नि पाय फॅक्चर झाला. तू आलीस त्या दिवशी त्याला शहरातल्या हॉस्पिटलमध्ये ऑपरेशनसाठी घेऊन गेलो. ऑपरेशन चांगलं झालं. आता बघू या. "

आदितीच्या मनावरचं केवढं ओझं उतरलं होतं.

"अण्णा मला वाटलं, तुम्हीच वृद्धाश्रमात आहात. मी आठ दिवस कसे काढले असतील मलाच माहीत. घरी फोन लावला तर कोणी उचलतं नव्हतं. "

बरोबर घरी कोणी नाही. मी इकडे आलो म्हणून तुझी काकू सिद्धेश्वरकडे गेली नि मी कालच इथे आलो. तुझी चिठ्ठी पाहिली नि तुला फोन केला.

"अण्णा, नाना काकांचा पाय बरा झाला की त्यांना घेऊन माझ्याकडे या. त्यांची योग्य काळजी आपण घेऊ या. "

नाना काका नि अण्णांना आदितीकडे येऊन आता महिना झाला होता.  दोघांनाही आता परत जावंस वाटत होतं. नाना काकाही आता सावरले होते. पण आदिती नि जावईबापू जाऊ देत नव्हते.

"अगं आदिती, जावयाच्या घरी एवढे दिवस राहू नये. "

जावयाच्या नका राहू मुलीच्या रहा. ”नेहमीप्रमाणे आदिती ठाम होती. शेवटी आश्रमातल्या लोकांची मदत करायला महिन्यातून काही दिवस जायचं काही दिवस आदितीकडे नि काही दिवस घरी अशा नियोजनात जाण्याची परवानगी मिळाली.

# मांत्रिक

"काय वहिनी, कशा आहात? बरेच दिवसांनी गावाकडं येणं केलंत. "

दिनेशने विचारलेल्या प्रश्नाला सुमतीने खुशीतच उत्तर दिलं.

“भावोजी मी मजेत आहे. तुमचाच आशीर्वाद. मग कधी येणार आमच्या गरिबाच्या घरी"

"वहिनी. तू गरीब, काय बोलतेस? आमची गरिबाची चेष्टा करतेस?"

"भावोजी कधी याल मुंबईला, रत्नाला घेऊनच या. "

"येईन जरा धावपळ संपू दे, नक्की येईन. "

गावची जत्रा म्हणून नोकरीनिमित्त बाहेर असणारे बरेचजण वेळ काढून आले होते. दोन दिवस गावात बरेचजण भेटतात. तेवढेच जुने दिवस आठवतात. नवीन उजाळा मिळतो. सुमतीला पाहून दिनेशला खूप समाधान वाटले. आपण आपल्या मित्राचा संसार वाचवल्याचा आनंद वाटला. नव्या जुन्याचा योग्य मेळ घालून दोन जीव उद्ध्वस्त होता होता वाचले होते.

असाच एकदा तो गावी आला होता. नुकतीच नोकरी लागली होती. गावापासून वर्षभर लांब राहिल्याने गावाची जास्तच ओढ लागली होती. आठवडाभर मनसोक्त गावात राहायचं. आई,वडील,भावंडांना भेटायचं नि मित्रांच्या संगतीत चार दिवस काढायचे होते. बाबांना शेतातल्या कामात मदत म्हणून दोन दिवस शेतावर रात्रीचा राहिला नि तिसऱ्या दिवशी गावातल्या घरात राहिला. मित्रांबरोबर गप्पा मारण्यात खूप वेळ गेला नि सर्वजण उशीरा झोपले.

"ये इकड़े गेली बघा. पळाली बघा. जाईल बघ आडवा रे अडवा. ”

कोणीतरी ओरडत होतं. खूपजणं धावत असावेत. त्या आवाजाने तो उठून बसला. कसलाच संदर्भ लागत नव्हता. घड्याळाकडे पाहिले तर दिड वाजला होता. तेवढ्यात आई बाहेरून आली.

"काय झालंय आई?"

"काय व्हाययचं? नेहमीचंच आक्काची सून पळाली. "

"पळाली? म्हणजे काय?"

“अरे, ती झपाटलीय, कधी कधी रात्रीचीच धावते, पळते नि सर्वांच्या झोपा उडवते. "

“सुदामाची बायको की काय?"

"होय, वर्ष होवून गेलं. काय सुचंना नि काय कळेना. चांगली पोरगी. असं का व्हावं कळंना. आक्काच्या जीवाला चैन नाही. एकुलती एक सून तिचं असं का झालं? काळजीनं अर्धी झालीय बघ. "

दुसऱ्या दिवशी बाबांचा डबा घेवून शेतावर जात होता तेव्हा सुमती भेसुमती रात्रीच्या प्रकाराचा मागमूस नव्हता पण थोडी नाराज वाटली.

दोन दिवस बरे गेले पुन्हा तोच प्रकार. रात्रीचा गोंधळ, धावपळ नि. पळापळ. आता दिनेशला कळेना ही जाते तरी कुठे एवढ्या रात्री अंधारात ती घाबरत नाही? आज त्याने ठरवले आपण बाहेरच झोपायचे. तो ओटीवर शेजारच्या मित्रांबरोबर झोपला. पण दोन दिवस काहीच घडले नाही. तिसऱ्या दिवशी तो मध्येच जागा झाला तर रस्त्यावरून कोणीतरी चालल्याचा भास झाला म्हणून निरखून पाहिले तर कोणीतरी बाई असावी. एवढ्या रात्री एकटीच बाई कोण असावी? अरे सुमती तर नाही? त्याला आठवलं अगोदरचे सगळे. नि त्याने ठरवले तिच्या नकळत, ती कोठे जाते ते पाहायचे. तो तिचा पाठलाग करत गेला. ती शेताकडे जाण्याच्या रस्त्यावर छोटा ओढा होता. तिकडे जाताना दिसली पण पुढे गायबच झाली. त्याला आता उत्सुकता लागली. दुसऱ्या दिवशी तो पुन्हा जागत राहिला. पण त्या दिवशी काहीच घडले नाही. सट्टी संपली होती. नोकरीवर जाणे गरजेचे होते.

पंधरा दिवसांनी आई दवाखान्यासाठी म्हणून शहरात आली. बरोबर सुमतीला घेवून आली. तिच्या कपाळावर, पायाला लागलं होतं. अंगात ताप होता.

"अरे, हिला चांगल्या डॉक्टरकडे नेऊया. आक्काला यायचं होतं पण मी निघाले म्हणून नाही आली. "

संध्याकाळी तो आईला नि सुमतीला डॉक्टरांकडे घेवून गेला. डॉक्टरांनी विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाला ती उत्तर देत नव्हती.

"या जखमा कशामुळे झाल्या, काय लागलं? कधी लागलं?"

काहीच उत्तर देत नसल्याने डॉक्टरांनी जखमांवर लावण्यासाठी मलम दिलं. नि तापासाठी औषधं दिली. शहरात येऊनही सुमती हरवल्यासारखीच होती. उदास नि उदध्वस्त वाटायची. कसला विचार करतेय? नक्की कशामुळे नाराज आहे? काही कळत नव्हते.

आई सुदामा सुमतीला मुंबईला का घेऊन जात नाही? दिनेशच्या प्रश्नांवर आईला कसे काय सांगावे ते सुचेना. पण त्याच्या अनेक प्रश्नामुळे तिला सांगावेच लागले.

"अरे, सुरुवातीला नवीन सुनेला एकटीला पाठवायला नको. थोडे दिवस गावात ठेऊन घेऊन, थोडी रुळली की पाठवू. म्हणून पाठवलं नाही. "

नंतर तिची आई खूप आजारी पडली म्हणून दोन महिने माहेरी गेली. तिकडून आल्यापासून मी मुंबईला जाणार नाही म्हणतेय. सुदामा आला की ही एकतर आजारी पडते नाही तर माहेरी जाते. त्यात तिला झपाटलं तो त्रास वेगळाच सुरु झालाय.

दिनेशला हे सर्व काहीतरी वेगळंच चाललंय याची जाणीव झाली.

चार दिवसांनी दोघी गावी परत गेल्या. थोड्या दिवसांनी दिनेशही गावी गेला. सुमतीची तब्येत बरी वाटत होती. पण तिचं भूत मात्र तिला सतावत होतं. त्याने मित्रांच्या सोबतीने छडा लावायचा ठरवला. दोघं मित्र नि दिनेश कामाला लागले. पण याही वेळेस हाती काहीच लागले नाही.

"प्रभाकर, तू सुमतीला ओळखतोस?"

"कोण?"

"अरे, तुमच्या गावातली सुमती आमच्या गावातल्या सुदामाबरोबर लग्न झालंय ती. "

"होय, होय तिचं काय झालं. '

"झालं काही नाही, ओळखतोस ना? तिची आई कशी आहे. "

"चांगली आहे"

प्रभाकर नवीनच दिनेशच्या कंपनी आला होता. प्रभाकर एवढ्यात काही बोलणार नाही, दिनेशने हळुहळू तिच्याविषयी माहिती मिळवण्यास सुरुवात केली. प्रभाकरलाही दिनेशचा हेतू लक्षात आल्यामुळे एखाद्याचं भलं होतं असेल तर चांगलंच म्हणून त्याने मदत केली. सुमतीचं

गावातच नात्यातल्या मुलाबरोबर प्रेम होतं. घरच्यांना हे माहीत झाल्यावर त्यांनी समजावण्याचा प्रयत्न केला. पण सुमती ऐकणार नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी घाईघाईने सुदामाबरोबर लग्न लावून टाकले. त्याचवेळेस सुदामा सुमतीला मुंबईला घेवून गेला असता तर बरे झाले असते. जेव्हा सुमतीची आई आजारी पडली तेंव्हा सुमती दोन महिने माहेरी गेली नि पुन्हा तो मुलगा भेटला नि ती गुंतत गेली. ती रात्रीची गावाबाहेर त्याला भेटायला जाऊ लागली. ती रात्री बाहेर पडतेय हे लक्षात आल्यावर तिचा पाठलाग होऊ लागला नि त्यातूनच आपल्याला भूताने झपाटल्याचं नाटक तिने सुरु केलं. गुंता वाढतच चालला.

"आई सुमती वहिनीला घेऊन ये. इथे चांगल्या मांत्रिकाला दाखवू "

दिनेशने आईला शहरात बोलावून घेतलं नि सुमतीला एकटीला घेऊन तो बागेत गेला. थोड्याच वेळात प्रभाकर त्या मुलाला घेऊन तेथे आआला. आता सुमती गोंधळून गेली. रडारड, केली. पण दिनेश व प्रभाकरने शांतपणे दोघांना प्राप्त परिस्थितीची जाणीव करून दिली. यातून काय घडू शकते याची चर्चा केली नि योग्य निर्णय घेण्यासाठी वेळ दिला.

चार दिवस विचार करून सुमती एक दोन वेळा त्या मुलाला भेटली. नि दोघांनीही पुर्वायुष्यातील चूक दुरुस्त करायची ठरवली. सुमतीने सुदामाकडे मुंबईला जाण्याची तयारी दर्शविली. तो मुलगाही परत तिच्या आयुष्यात ढवळाढवळ करणार नाही असे सांगून निघून गेला. मांत्रिकाने भूत उतरवले होते.

आता सुमती सुदामाचा संसार सुखाचा आहे. दिनेशने भूत उतरवले. म्हणून आक्का नि आई समाधानी आहेत. आपल्या मित्राचा संसार वाचवल्याचे समाधान दिनेश व प्रभाकरला आहे.

# आघात

"आजी ऽ ये आजी गं"विनयने हाक मारली तरी गिरीजाबाईची तंद्री काही मोडली नाही. विनयने जवळ येऊन त्यांना हात लावला तेव्हा त्या गतस्मृतीतून भानावर आला.

"काय रे बाळा, काय झालं?"

"आजी बाहेर कोणीतरी आलं आहे. चल ना. येतेस ना?"

"हो. आलेच हं"म्हणत गिरीजाबाई उठल्या,

तोंडावर पाणी मारून बाहेर आल्या. सुनबाईची मैत्रिण भेटायला आली होती. गिरीजाबाईंना पाहताच तिचे डोळे भरून आले.

"आईऽऽ अशी कशी वर्षा आपल्याला सोडून गेली हो?"

दोघींनाही अश्रू आवरत नव्हते. सुजल आणि वर्षा, दोघांनाही अचानक ईश्वराने आपल्यापासून का नेलं? विनयला पोरकं का केलं? या वयात तरुण मुलगा आणि सून. हो तिच्या पोटात वाढत असलेला अंकूरही का हिरावून नेला? विनयच्या जीवनात एवढी पोकळी का निर्माण केली? हे काय घडलं? नि का घडलं? अशा प्रश्नांनी त्यांच्या डोक्यात गर्दी होत होती. प्रश्नच प्रश्न, उत्तरं मात्र मिळत नव्हती. आज सुजल नि वर्षाला जावून एक महिना झाला पण येणाऱ्यांची, भेटणाऱ्यांची रीघ चालूच होती. हा अज्ञानी जीव मात्र गोंधळला होता. विनयला दुःखातून बाहेर काढणं अवघड होतं. ऑफिसला गेलेले बाबा नि शाळेत गेलेली आई परत आलेच नव्हते? का? अपेक्षा काय केली नि झालं काय? सारंच सुन्न करणारं होतं. वाटत होतं जे घडलं ते स्वप्न असावं नि ते हवेत विरून जावं. स्वच्छ जावं. स्वच्छ, सुदर जाग यावी नि सर्व काही पूर्ववत असावं. पण शक्यच नव्हतं. विनय येऊन मांडीवर डोकं ठेवून झोपला. नेहमीप्रमाणे हात त्याच्या केसातून फिरु लागला नि डोळे पुन्हा पाझरू लागले. आवरून त्यांनी त्याला झोपवलं. आपणच तर घरातल्या सर्वांना सांगितलं होतं की विनयच्या समोर कोणी रडू नका. त्याला त्याच्या अवस्थेतून बाहेर काढा आणि आपणच रडत आहोत. त्यांनी विचार झटकले त्याला नीट झोपवलं नि त्या उठल्या.

जे घडू नये ते घडलं होतं. ते स्विकारायलाच पाहिजे होतं. त्यातून पुढे जायला पाहिजे होतं. या निष्पाप जीवासाठी तरी पुन्हा उभं राहायलाच पाहिजे. या जाणीवेने त्या कणखर

बनल्या. आपण आहोत तोपर्यंत त्याच्या पाठिशी आहोत पण त्याच्या आयुष्याला आपण पुरणार नाहीत. स्वार्थी जगात कोण कोणाचा आहे? पैसा, सत्ता नि हक्क यामुळे काय होऊ शकत, हे अनुभवाने त्यांना चांगलंच माहीत होतं. पैसा माणसाची नियत कशी बदलवू शकतो आणि माणूसकी, नाती, नितिमत्ता यांची धुळधाण होऊ शकते. विनयच्या नशिबात पैसा, जागा म्हणजे ऐश्वर्य भरपूर होतं पण मायेचं छत्र, आधार मात्र नाहिसा झाला होता.

सुजल नि वर्षाने एकाच मुलावर आपला निर्णय पक्का केला होता. विनय पाच वर्षांचा होईपर्यंत गिरीजाबाईंनी वाट पाहिली नि नंतर मात्र त्या त्यांच्या मागेच लागल्या. एकट मुल एकलकोंड होईल. त्याला एक तरी भावंडं हवं. मग मुलगा असो की मुलगी. भविष्यात त्यांना नातं जपणारं कोणीतरी नको का? प्रेम,आपुलकी, आस्था कशी वाढणार? सण समारंभाला सोबत नको का? अनेक प्रकारे त्या कधी प्रेमाने तर कधी अधिकाराने समजावत होत्या. वर्षालाही कधी कधी तीव्रतेने जाणवायचं पण सुजलपुढे काहीही चालायचं नाही. पण वर्षात आता ठरवलंच होतं आणखी उशीर बरोबर नाही. वयातलं अंतर वाढत जाईल नि नंतर विनय भावंडाला स्वीकारेल का? तिने सर्व दृष्टिकोनातून आपला निर्णय सुजलला पटवून दिलाच. नि दुसऱ्या अपत्याचा विचार पक्का झाला नि नवीन पाहुण्याच्या आगमनाची चाहूल लागताच विनयसाठी बहिणच असावी अशी प्रार्थना सुरु झाली. विनयही आता चौथीत शिकत होता. आपण दादा होणार या जाणिवेनी भलतीच स्वारी खुशीत होती.

"आई आता तू माझ्याशी नाही खेळलीस तरी चालेल! मी बाळाबरोबर खेळेन. आम्ही हे करू नि ते करू”असं स्वप्नरंजन सुरु झालं होतं.

शेजारच्या काकू, आजी त्याला विचारायच्या, "विनय तुला बहिण हवी का भाऊ हवा?"

तो पटकन सांगायचा, “मला बहिणच हवी. ती मला राखी बांधेल. मला ओवाळील. माझ्यासाठी काय काय करेल?"

वर्षाला आता पाचवा संपून सहावा महिना लागला नि तिने गाडी चालविणे बंद केले. शाळेत जाताना ती रिक्षाने जायची. जेव्हा जेव्हा सुजल घरी असायचा तेव्हा तो सोडायला नि आणायला जायचा. पंधरा ते वीस दिवसानंतर वर्षा रजेवरच राहणार होती. नेहमीप्रमाणे विनयला शाळेच्या बसमध्ये बसवून ती रिक्षाने शाळेत गेली नि येताना मात्र रिक्षा मिळेना म्हणून मैत्रिणीच्या गाडीवरून येत होती. तेवढ्यात सुजल न्यायला येत असल्याचा फोन आला. रस्त्यातच

ती मैत्रिणीच्या गाडीवरुन उतरून ती सुजलच्या गाडीवर बसली. परिस्थिती लक्षात घेऊन तो सावकाश गाडी व्यवस्थित चालवत होता. सकाळी भरणाऱ्या शाळा सुटल्यामुळे दुपारच्या वेळी रस्त्यावर गर्दी होती. काही कळायच्या आतच एक टेंपो वेगातच आला. बऱ्याच जणांना चुकवत धक्के देत येऊन तो सुजल वर्षाच्या गाडीवर जोरात आपटला नि दोघेही गाडीसहीत उंच उडाले नि खाली आपटले. त्याच टेम्पोचे चाक त्यांच्या डोक्यावरुन गेल्याने परिस्थिती भयावह झाली. एका क्षणात होत्याचं नव्हतं झालं. बघता बघता बातमी वाऱ्यासारखी पसरली. दवाखान्यात नेऊन काही उपयोग झाला नाही.

आप्तस्वकीय, नातेवाईक जमा झाले. हे सर्व विनयला कसे सांगायचे नि कसे सावरायचे हा प्रश्न पडला. सर्व वातावरण नि परिस्थिती पाहून तो खूप रडला. घाबरला नि स्तब्ध झाला. प्रत्येकाचा जीव त्याच्यासाठीच तुटत होता. काय स्वप्न पाहिली. त्याला सोबती आणणारे आई बाबा त्याच्या सोबत्यासह त्याला सोडून कायमचे निघून गेले होते. पुन्हा कधीही न येण्यासाठी. एक सोबती मागितला तर त्याने तीन नेले. या या मोठ्या जगात एकट्याला सोडून गेले. गिरीजाबाईंना विनयच्या याची चिंता सतावत होती. कसा वाढेल. जीवनातील घडामोडींना सामोरा जाईल. एकटेपणाच्या भेडसावणाऱ्या सावल्यांचा त्याच्या जगावर कसा परिणाम होईल. सध्या या नैराश्यातून त्याला कसं बाहेर काढायचं? त्यासाठी त्याला शाळेत पाठवायलाच हवं. मित्रांबरोबर खेळेल जरा तरी वातावरण बदलेल. सर्व काही पार पडत होतं. आता विनय साठी विचार करायलाच पाहिजे होता. दुसऱ्याच दिवशी त्या विनयला शाळेसाठी तयार करु लागल्या. पण तो कसलीच प्रतिक्रिया देईना. खुप गप्पा मारण्याचा त्याला मित्रांच्या आठवणीचा उजाळा द्यायचा प्रयत्न केला. तेव्हा तो हमसून हमसून रडू लागला. त्याला आईबाबांची खूप खूप आठवण झाली. तो व्याकूळ झाला. गिरिजाबाईंनी कसे बसे त्याला तयार केले व शाळेत घेऊन गेल्या. प्रिन्सिपलसर त्याचे सर्व शिक्षक त्याच्यासमोर आले. तेव्हा पुन्हा तो खूप रडला. क्लासटिचर मॅडमनी त्याला जवळ घेऊन खूप समजावले. त्याला वर्गात घेऊन गेल्या.

त्याच्या मित्रांना त्याची काळजी घ्यायला सांगितली. तो वर्गात बसल्याचीखात्री करून गिरीजाबाई घरी परतल्या तर इन्स्पेक्टर साहेब आले होते. ज्या टेम्पोमुळे अपघात झाला होता त्याचा चालक नि मालक याना तेव्हाच अटक झाली असली तरी पुढे होणाऱ्या कोर्टकारवाईसाठी सूचना देण्यासाठी आले होते.

गिरीजाबाईनी विचारले, "टेम्पो कोण चालवत होता नि असा अपघात त्याच्या हातून घडेपर्यंत तो काय झोपला होता?"

मला त्याला भेटायचं आहे. माझ्या विनयच्या आईबाबांना का रे बाबा मारले, त्याला पोरकं केलंस. कुठे फेडशील पाप? त्यांचा कंठ दाटून आला. शब्द फुटेना.

तुमचा मुलगा नि सून दुर्दैवी म्हणावी लागतील. त्या चालकाने त्या दिवशी तीन ते चार जणांना धक्के दिले. घाबरून तो आणखी वेगात जात होता. त्यामुळे त्याच्या हातून आणखी चुका होत गेल्या नि त्याच्या वर्तनाची शिक्षा म्हणून सुजल वर्षाला आपला जीव गमवावा लागला.

# वेग

सुसाट बाईकवरून कॉलेज तरुणांचा एक गट अगदी जवळून गेला. क्षणभर वाटलं जाता जाता तो आपल्यालाही घेऊन जाणार. थोडंसं सावरेपर्यंत पाठीमागून दुसरा गट तेवढ्याच वेगात आला. पण हा गट होता मुलींचा. त्याही भन्नाट वेगात होत्या. क्षणात डोळ्यासमोरून नाहीशा झाल्या.

"काय ही तरुणाई, यांना वेगाचं असलं जीवघेणं वेड

का आहे? शांतता स्थिरता जणू माहितच नाही. जेव्हा बघावं तेव्हा वाऱ्याच्या घोड्यावर बसलेले. क्षणात इथे तर क्षणात तिथे पण बाळांनो थोडं आयुष्याकडे गंभीरपणे पाहा. सुंदर आयुष्याचा भविष्याचा विचार करा. "दाजीसाहेबांच्या मनात विचार गर्दी करू लागले होते. त्या कॉलेज तरुणांनी त्यांच्या मनाच्या शांत डोहात तरंग उठवले होते. त्या तरंगाचं वादळात रुपांतर झालं तर सगळंच ढवळून निघणार होतं.

"दाजी, अहोऽऽ दाजीऽऽ"

पडवळ काकांच्या हाकेमुळे दाजींची विचारशृंखला तुटली होती.

"आलात, झाला का, तुमचा वॉक पुरा"

होय, दाजी आज जरा आवरताच घेतला, चला निघू या.

"होय, चला, मी पण आज थोडाच प्राणायाम केला. अंधारही पडू लागलाय निघू या. "

"बाकी दाजी तुमची तब्येत हल्ली सुधारली म्हणजे काही तक्रार दिसत नाही. "

“पडवळ अहो, या वयात काही ना काही चालूच असणार नि चालूच राहणार अशी. "दाजीनी विषय संपवला. जेव्हापासून दाजी इथे राहायला आले तेव्हापासून पडवळ काकांबरोबर मैत्री झाली होती. गेल्या आठ वर्षांपासून दोघे बरोबरच फिरायला येत होते. त्या निमित्ताने चार सुख-दुःखाच्या गोष्टीची देवाण घेवाणही व्हायची. तेवढ्यात पुन्हा बाईक सुसाट वेगात समोरुन आल्या.

"अहो, पडवळ जरा बाजूला व्हा"

तोपर्यंत ती मुलं निघूनही गेली होती.

“आजकाल रस्त्यावरुन चालायचीसुद्धा भीती वाटत होती. या गाड्या नि त्यांचा वेग काय होणार समजत नाही. किती वेळ वाट बघतेय बाबा मला काळजी वाटते. संध्याकाळची रस्त्यावर किती गर्दी असते. लवकर येत जा ना. "

दाजींची सुनबाई काळजीने बोलत होती. ”अगं मी लहान आहे का? आणि पडवळ असतात ना? तू उगाच काळजी करतेस. "

"बरं, हे घ्या पाणी”

तोपर्यंत ती चहाही घेऊन आली.

"देविका, तू कधी आलीस नि अनिल आला का?"

"नाही अजून त्यांना उशीर होणार आहे नि आदित्य नि अपूर्वा ही उशीराच येतील. "

"बाबा, जरा आराम करा. मी स्वयंपाकाचे बघते. ”

देविका आपल्या कामाला निघून गेली. दाजींनी सकाळचा पेपर पुन्हा उलटा पालटा केला. काही वाचायचं राहिलं नव्हतं. ते किचनकडे निघाले.

"देविका, अगं तुला काही मदत करू का?"

"नको बाबा, मी करेन”

"अगं दे ती भाजी मी निवडून देतो, आण डबाही दे. मी फळंही कापून देतो. दोघांनाही ज्यूस लागेल ना?"

दाजींना रिकामपण नकोसं वाटायचं. त्यांचं काही ना काही चालू असायचं. कुंड्यांना पाणी घाल. मुलांचा पसारा उचल, भाजी निवडून दे. कधी कधी भाजी आणून दे. तेवढाच विरंगुळा. निवृत्तीनंतरचा रिकामपणा कधी जाणवला नाही, पण सरुच्या जाण्याने आलेलं एकटंपण थोडं घाबरवून टाकणारं होतं. बघता बघता गप्पा मारत देविकाने काम आटोपलंही होतं.

"बाबा तुम्हाला ज्यूस थंड देऊ का? साधा देऊ. मी जराशी खाली जाऊन येते. ”

"साधाच दे"

दाजी आता टी. व्ही. समोर विसावले. चॅनल बदलता बदलता कंटाळले त्याच त्याच मालिका नि रटाळ कार्यक्रम त्यांना नको वाटत. सतत एक जागती हालचाल अवती भवती हवी असायची. कधी घर म्हणजे गजबजलेलं असायचं, तेव्हा वाटायचं थोडी शांतता मिळाली तर बरं होईल. मुलांच्या सोबत त्यांच्या मित्र मैत्रिणी,नातेवाईक, शेजारी पाजारी नि सरुचा उत्साह यामुळे घर नेहमी भरलेलं. त्यामुळेच तर सरुच्या नंतर सगळं घर स्तब्ध झालं. तसेच मनही उद्ध्वस्त झालं. सहवासाची, सहचार्याची सवय,एवढ्या वर्षाच्या सुखी संसाराची सोबतीण जेव्हा मध्येच नाहीशी होते तेव्हा येणारं नैराश्य आयुष्य बदलून जातं. दाजींना तिन्ही मुलगेच होते. सरु म्हणजे त्यांची पत्नी सरीता. त्यांना दोघांनाही वाटायचं एक मुलगी असती तर भावांना बहिण नि आपल्याला लेक असली असती. पण ईश्वर इच्छेपुढे काय करणार. लेकीची उणीव भरून काढायला दमयंती होती. सरुची भाची सारखी आत्या, मामा करत

मागे पुढे धावणारी जणू ती त्यांच्याच घरातली झाली होती. तिघेही तिची चेष्टा, मस्करी करायचे, भांडायचे नि खेळायचेही. हळुहळू सरुच्या मनात दमयंतीला सून करून घ्यायचे विचार रुजू लागले होते पण दाजी म्हणायचे,

"अगं, अजून मुलं लहान आहेत. मोठी झाल्यावर आपलं मत नाही पटलं तर?"

"शरद आपल्या शब्दाबाहेर जाणारा नाही. "

आणि त्यानी त्या दोघांच्या मनावर तेच बिंबवले नि तसेच केलेही. दुसरा मुलगा अनिल त्याच्यासाठीही त्यांनी नात्यातलीच मुलगी बघून ठेवली होती. पण तो पुण्याला शिक्षणासाठी असताना त्याने स्वतःच्याच बरोबर असणाऱ्या मुलीबरोबर लव्ह मॅरेज केलं. म्हणजे विचारले पण आईचा नकार आहे म्हटल्यावर लग्न उरकून घेतलं. पण देविकाने त्यांना प्रेमाने जिंकून घेतलं. इतकं की, सासू सुना मैत्रिणी कधी झाल्या ते कळलंच नाही. छोटाही समीर तसा आईवेडाच होता. त्यानेही आईची निवड योग्य मानून लग्न केलं. सर्व कसं सुखात नि आनंदात चाललं होतं. प्रत्येकाचा संसार व्यवस्थित चालला होता. यापेक्षा आणखी कशाची

अपेक्षा नव्हती. एके दिवशी शरदच्या मुलाने आजीकडे गाडीचा हट्ट धरला. त्याला माहीत होतं, आपण केलेला हट्ट आजी पुरा करणारच. दाजींनी त्याला एवढ्या लहान वयात गाडी वापरायची नाही सांगितलं तरी पण आजीची

मनधरणी करून त्याने गाडी मिळवलीच नि मग प्रत्येक कामासाठी त्याला गाडीच लागू लागली. तसा तो गाडी चांगली चालवायचा पण वेगावर मात्र नियंत्रण ठेवणं त्याला जड जायचं. आजीलाही आपल्या नातवाचं कौतुक होतंच. त्या त्यांचे हट्ट पूरे करायच्याच पण अवि पहिलं

नातवंड असल्यामुळे जास्त जवळचा नि आजीच्या मर्जीतला म्हणून तर शरद-दमयंती नको म्हणत असतानाही आजीने त्याला गाडी दिली.

सर्व सुखाला कोठेतरी गालबोट लागलं होतं. अवि आजीला गाडीवरून शेतावर घेऊन जात असताना गाडी स्लिप झाली नि अविचा पाय मोडेल. पण सरुच्या डोक्याला मार लागल्याने प्रयत्नांना यश येवू न शकल्याने सरु सोडून गेली. तिच्या जाण्याने सारं घर हादरलं. नि उद्ध्वस्त करून गेलं. तेव्हापासून आजीमुळेच असं झालं. गाडी दिली नसती तर असे झालंच नसतं. असं त्या दोघांना वाटत होतं. जे घडू नये ते तर घडलंच होतं. आता पश्चातापाशिवाय हातात काही नव्हतं. दाजी मात्र एकटे होते त्यांना त्या घरात जीव रमवणं कठीण जात होते. म्हणून अनिल देवकी त्यांना इथे घेऊन आले होते. मुला नातवंडात त्यांचा वेळ चांगला जात होता पण मनाची पोकळी काही भरून निघणे शक्य नव्हते. तेंव्हापासून लहान वयात गाडी चालविणारी मुलं पाहिली की, त्यांना धस्स होतं नि सरुच्या आठवणीने ते बेचैन होतात.

# अनमोल

"ताई, मुलगी अगदी तुझ्यासारखी आहे. बघ, कशी बघतेय, पिलू.

आई बाबांनी किती वाट बघितली तुझी, बाबाकडे जा हं"अनघाच्या आवाजाने अपर्णा डोळे उघडण्याचा प्रयत्न करत होती. पण भूल उतरली नव्हती. सिझर झाल्यामुळे आरामाची गरज होती, तरीही तिला डोळे उघडून बाळाला पहावं असं वाटत होतं. तेवढ्यात अनिरुद्ध बाळाला घेऊन तिच्याजवळ आला.

“अपर्णा, हे बघ बाळ व्यवस्थित आहे. काही काळजी करू नकोस, आराम कर. ”

तिने हसून त्याच्याकडे पाहण्याचा प्रयत्न केला. अपर्णा नि अनिरुद्धला लग्नानंतर पंधरा वर्षांनी मुलगी झाली होती. आई, बाबा झाल्याचा आनंद अवर्णनीय तर होताच पण स्वप्नपूर्तीचा.

इच्छापूर्तीचा आनंद नि समाधान ओसंडून वाहत होते. या अगोदर बाळाची. चाहूल तरी लागत होती पण निसर्गाची साथ मिळत नव्हती. वारंवार गर्भपात व्हायचा. तिला कळत नव्हते ईश्वर आपल्याला आई होण्याची संधी का देत नाही? हा जीवघेणा खेळ का चाललाय? आपण कुठे कमी पडतोय? त्यापेक्षा आपण हे सारं थांबवू या. त्या अजान जिवांच्या विरहाने दुःखी व्हायला नको. त्यांना तरी का शिक्षा? तिचा जीव व्याकूळ व्हायचा. आता तिला प्रेग्नेंट राहिल्यापासून भिती वाटायला लागायची, दडपण यायचं, औषधोपचार, व्रतवैकल्ये सारं काही चालू. असायचं पण या वेळेस डॉक्टर म्हणाले होते. अपर्णा या वेळेस सारं काही ठिक होईल. टेन्शन घेऊ नकोस. आपण बेडरेस्ट घेऊ. तू आता वर्षभर रजा घे आणि त्याप्रमाणे अपर्णा वर्षभर रजा घेवून घरीच थांबली. योग्य औषधे, आहार, विहार याचे नियोजन केले गेले. कितीही प्रयत्न

केला तरी मागच्या आठवणी यायच्याच. मन साशंक व्हायचं नि ती डॉक्टरांकडे जायची. पण डॉक्टर कधीच वैतागले नाहीत. त्यांनी प्रत्येक वेळी तिला मार्गदर्शन केलं. समजूत घातली नि स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला.

अनिरुद्ध योग्य ती काळजी घेत होता पण अपर्णाला एकटीला घरी ठेऊन कामावर जाताना त्याला काळजी वाटायची. मदतीला, सोबतीला येऊन राहील असं कोणी नव्हतं. प्रत्येकजण आपापल्या व्यापातगुंतलेला होता. दोष द्यायला, रितेपणाची जाणीव करून द्यायला नि टोचून बोलायला मात्र सगळे तयार असायचे. जवळच्यांनी तर दुखावण्याची एकही संधी

सोडली नव्हती. जसं यशस्वी संसाराचं नि समाधानाचं परिणाम म्हणजे मुल होणं. अपर्णा नि अनिरुद्ध सगळया अनुभवांमुळे खूप दुखावले होते. हळवे झाले होते. यावेळेस कोणताही आघात पचवण्याची वेळ आपल्यावर यायला नको म्हणून देवापुढे साकडे घालत होती.

"देवा, हे नऊ महिने नि नऊ दिवस चांगले जावू देत नि योग्य पोषण होऊन सुदृढ बाळ जन्माला येऊ दे. "

अनिरुद्धला माहीत होतं. अपर्णा आता कोणताही आघात पचवण्याच्या. शारीरिक नि मानसिक स्थितीत नाही. यावेळेस काही झालं तर सावरणं कठीणच होतं. पण प्रयत्नांची नि मनोधैर्याची उंची बरीच वाढली होती. सकारात्मक विचारांमुळे नि जबरदस्त इच्छाशक्तीमुळे अनेक प्रसंग नि समस्यांना सामोरं जाता येत होतं. देवही अजून परीक्षा घेतच होता. तिच्या सासुबाईना हार्टअॅटॅक आला म्हणून अनिरुद्धला जावे लागले.

तिला एकटीलाच काही दिवस रहावे लागेल,त्यातून सावरत नाही तोपर्यंत आईलाही अॅटॅक येऊन ती वारली. पुन्हा धावपळ, खचणं नि दुःख काय होणार काही सुचत नव्हते. पण त्यातूनही सर्वकाही ठीक होत गेले. नऊ महिने व्यवस्थित पार पडल्याने डॉक्टर कॉन्फिडंड होते. आता ते सतत लक्ष ठेवून होते. काहीही झालं तरी सर्व काही व्यवस्थित व्हायलाच पाहिजे म्हणून सतर्क होते.

नऊ महिने नऊ दिवस झाले. बाळाची वाढ व्यवस्थित होती. वयाचा विचार करता अपर्णालाही रिस्क घ्यायची नव्हती

काही बरं वाईट झालं तरी चालेल पण बाळ सुखरुप असलं पाहिजे हा तिचा हट्ट होता. प्रत्येक वेळी सोनोग्राफी झाली की, नातेवाईक शेजारी विचारायचे,

"मुलगा आहे की मुलगी?”तिला माहीत नाही हे त्यांना पटायचे नाही.

"अगं, एवढ्या उशिरा होतं आहे तर मुलगाच होऊ दे. "

असं जावा नि नंदा म्हणत. तिला त्यांच्या मनोवृत्तीची चीड यायची.

"अहो. मुलगा होवो किंवा मुलगी, काय फरक पडतो. बाळ सुदृढ

निरोगी असणं महत्त्वाचं. मुलगी झाली तरी नि मुलगा झाला तरी

आईच होणार आहे. अनिरुद्धला तर मुलगीच हवी होती नि आज एक गोंडस. गोड, निरोगी सुदृढ बाळाचे आईबाबा होण्याचं भाग्य लाभलं होतं. नऊ महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर ईश्वराने तिला मातृत्व बहाल केलं होतं. रितेपणाला पूर्णविराम दिला होता.

शुद्धीवर आल्यावर जवळ दिलेल्या बाळाच्या स्पर्शाने ती खूप हळवी झाली. डोळे वाहू लागले, मातृत्वाच्या जाणीवेने अंगावर रोमांच उभे राहिले. तेवढ्यात डॉक्टर आले.

"अपर्णा, तुझी बेबी एकदम हेल्दी आहे काही काळजी करू नको,

स्वतःला सांभाळ. "

या आणि अशा सूचना देऊन गेले. आता भेटायला येणारा प्रत्येकजण मुलगा झाला असता तर बरे झाले असते. असो पुढच्या वेळेस मुलगाच होईल म्हणून सांगत होते.

आता अपर्णा आणि अनिरुद्धने ठरवले होते, अति हाव बरी नाही. एकाच मुलीवर थांबायचे. वाढत्या वयातही बाळ व्यवस्थित होते त्याबद्दल हात जोडून ईश्वराचे आभार मानले.

“बाळाला सुखी ठेव नि दीर्घायुष्य दे. ”

अशी विनंती केली.

स्त्री-पुरुष समानतेच्या युगात स्त्री कुठे कमी आहे. तिने आपलं कर्तृत्व वेळोवेळी सिद्ध केलं आहे. मुलीच्या येण्याने खरंतर. खूप आनंद झाला होता. तिच्या बाळलीला पाहता पाहता दिवस कसे भराभर संपत होते. रुणझुण वाजणाच्या पैंजणांनी घर कसं भरून गेले होते. तिच्या तोंडून आई नि बाबांच्या हाकेने तृप्त झाले होते. आता यापेक्षा वेगळं काही नको. नऊ महिन्यांच्या प्रतिक्षेला आलेलं यश हे अनमोल असंच होतं. याच्यापेक्षा श्रेष्ठ काहीच असू शकत नाही. हा अनमोल हिरा फक्त जपायचा नाही, तर त्याला पैलू पाडून त्याचे तेज वाढवायचे नि मुलगी आहे म्हणून सर्वांनी तिच्याकडे कौतुकाने नि आदराने पाहिलं पाहिजे. अपर्णाने नि अनिरुद्धने आपल्या लेकीच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न सत्यात उतरवण्याकडे वाटचाल सुरु केली होती.